विकणे आहे
भेंडा खुर्द, ता. नेवासा
येथील मुख्य गल्लीतील
राहण्यास योग्य प्लॉट
योग्य किंमत आल्यास
तातडीने विकणे आहे.
संपर्क : +91 98503 86599



अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १९९ । रविवार ३ मे २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 I www.rashtrasahyadri.com



वेगवान सेवा... विश्वास आमचा!
साईवेद प्रकाशन
श्रीरामपूर-अहिल्यानगर
श्रीरामपूर-संगमनेर
वेळेवर डिलिव्हरी हीच आमची खरी सेवा!
डेली पार्सल सेवा
दररोज पार्सल – वेळेवर, सुरक्षित व खात्रीशीर!
वेगवान सेवा – वेळेवर पार्सल डिलिव्हरी
सुरक्षित सेवा – आपल्या पार्सलची पूर्ण काळजी
विश्वासाई सेवा – ग्राहकांचा विश्वास, आमची ओळख
दररोज सेवा – नियमित व खात्रीशीर पार्सल सेवा
मो. 87667 25308, 70207 44080
आजच संपर्क करा! वेळेवर सेवा, समाधानाची खात्री!
सेवा मार्ग : श्रीरामपूर – अहिल्यानगर – संगमनेर




'सहजयोग'
भाग ४३

## आनंद याची परिभाषा करता येत नाही कारण आनंदाला उपमाच नाही

आनंदात सुख आणि दुःख अशा दोन बाजू नसतात. निव्वळ आनंद, केवळ आनंद आणि जे ज्ञानेश्वरांनी सांगितलं होतं कि सोनियाचा दिन आहे, ते आलेलं आहे, ते घडलेलं आहे. फक्त ते जाणलं पाहिजे आणि मिळवलं पाहिजे. पण तुम्ही सुक्ष्मातच नाही. तुमचं लक्ष सुक्ष्मात नाही आहे. मग करायच कसं काय? तुम्हाला आश्चर्य वाटेल या महाराष्ट्रात अनेक साधूसंत झाले आणि कार्य करून गेले; त्यांनी आपले इथे प्राण सोडले. रक्त सांडलं. इतकं काही उत्तर हिंदुस्थानात झालेलं नाही. पण अहो आमचा सहजयोग तिथे असा पसरलेला आहे, घरोघर दारोदार सगळे, म्हटलं हे आले, ही कुणाची कृपा आहे. एव्हढे आम्हंचे साधूसंत; त्यांनाही छळलच म्हणा, त्यांचीही काय विशेष आवभगत केलेली नाही. त्यांनाही छळून काढलं आणि आता असं वाटतं की त्यांचं एवढं कार्य गेलं कुठे? तेंव्हा आता लक्षात घेतलं पाहिजे की आम्ही इथल्या महाराष्ट्राला खरोखर महाराष्ट्र जर करायचा असला तर कुंडलिनी जागरणाला तयार व्हावं. स्वतःचं करूनच घ्यायचं पण इतरांचं करायचं. आत्मसाक्षात्कार आणि त्याची अनुभूती मिळाली पाहिजे. उगीचच कुणी म्हटलं मी देतो आत्मसाक्षात्कार, होऊ शकत नाही. त्याची अनुभूती आहे. आदिशंकराचार्यांनी वर्णन केलंय आणि त्यात त्यांनी स्पष्ट सांगितलं कि तुमच्या मध्ये हे स्पंदन व्हायला पाहिजे. स्पंदन शब्द वापरला. ज्याला आम्ही इंग्लिश मध्ये व्हायब्रेशन्स म्हणतो. ते स्पंदन यायला पाहिजेत. (७ मार्च २००० पुणे) अधिक माहितीसाठी

www.sahajayogamumbai.org
8871519191
सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# राजीनामा द्या अन्यथा संपवू..!

# त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलातील छळाने घेतला सचिवाचा जीव

### सचिव मनीष घाडगे पाटलांच्या आत्महत्येप्रकरणी संस्थेच्या अध्यक्षांसह ६ जणांवर गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा फाटा येथील नामांकित 'त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान'च्या सचिवपदावर असलेल्या मनीष घाडगे-पाटील यांना आत्महत्येस प्रवृत्त करून त्यांचा जीव घेणाऱ्या क्रूर प्रकाराने संपूर्ण जिल्ह्याला हादरवून सोडले आहे. संस्थेच्या सचिवपदाचा राजीनामा द्यावा आणि हक्काची वैयक्तिक मिळकत संस्थेच्या नावावर करावी, यासाठी त्यांना खोट्या बदनामीच्या केसेसमध्ये अडकवण्याची धमकी देऊन मानसिक छळ करणाऱ्या संस्थेच्या अध्यक्षांसह ६ जणांविरुद्ध नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने शैक्षणिक क्षेत्रात मोठा खळबळ उडाली असून, 'ज्ञानदानाचे मंदिर' असलेल्या संस्थेत रक्ताचे कारस्थान शिजल्याची चर्चा आता सर्वत्र होत आहे.



त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे सचिव स्व. मनीष घाडगे-पाटील यांनी ऑक्टोबर २०२५ पासून ते २८ एप्रिल २०२६ पर्यंत अत्यंत मानसिक त्रासातून हा जीवघेणा प्रवास केला. आपल्याच संस्थेतील काही लोकांमुळे त्यांना मृत्यूला कवटाळावे लागले, असा धक्कादायक आरोप त्यांच्या पत्नी मनीषा मनीष घाडगे यांनी फिर्यादीत केला आहे. पतीच्या निधनानंतर आता पत्नीने थेट कायदेशीर लढा सुरू केल्याने या प्रकरणातील गुन्हेगारीचे धागेदोरे उघड झाले आहेत.

एका मोठ्या शैक्षणिक संस्थेचे सचिव असलेल्या व्यक्तीला आपल्याच पदाधिकाऱ्यांकडून असा 'त्रास' दिला जावा आणि परिणामी त्यांचा बळी जावा, ही बाब अत्यंत गंभीर आहे. ही संस्था चालवणारे लोक की गुन्हेगार? असा प्रश्न आता नेवासावासियांना पडला आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असला तरी, दोषींना कठोर शिक्षा मिळावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

नेवासा पोलिसांच्या वतीने या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, यामागे आणखी कोणती मोठी कारस्थाने दडलेली आहेत, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल. मात्र, या घटनेने संस्थेच्या प्रतिष्ठेची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत.

#### या ६ जणांवर गुन्हा दाखल

**फिर्यादीनुसार, संस्थेच्या अध्यक्षा सुमती साहेबराव घाडगे, त्यांच्या दोन मुली स्नेहल साहेबराव घाडगे व श्रुती साहेबराव घाडगे, जावई चेतन चव्हाण, प्राचार्य सोपान बाजीराव काळे आणि समन्वयक अनुराधा उत्तम गोरे या सहा जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे सर्वजण मिळून सचिव मनीष घाडगे-पाटील यांच्यावर संस्थेच्या राजीनाम्यासाठी आणि मालमत्तेच्या हस्तांतरणासाठी दबाव टाकत होते, असे फिर्यादीत म्हटले आहे.**

#### 'खोट्या केसेस'चा पाश

**राजीनामा द्या अन्यथा खोट्या बदनामीच्या केसेसमध्ये अडकवून आयुष्य उद्ध्वस्त करू, अशी उघड धमकी देऊन मनीष घाडगे यांना मानसिक खच्चीकरणाच्या अशा टप्प्यावर आणून सोडले की, त्यांना आत्महत्येचा मार्ग निवडावा लागला. उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. मात्र, या मृत्यूनंतर आता त्यांच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीमुळे या 'पांढरपेशा' गुन्हेगारांचे चेहरे उघड झाल्याचे बोलले जात आहे.**




# वडिलांच्या विवाहबाह्य संबंधांच्या वादातून मुलानेच घेतला जीव

### पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न; श्रीरामपूर शहर पोलिसांकडून आरोपी पुत्राला अटक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील दत्तनगर परिसरात कौटुंबिक वादातून मुलानेच वडिलांचा खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. वडिलांच्या विवाहबाह्य संबंधावरून झालेल्या वादातून मुलाने धारदार सुऱ्याने वडिलांच्या छातीवर, हातावर आणि पाठीवर वार करून त्यांना ठार मारले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, श्रीरामपूर शहर पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली आहे.

घटनेचा सविस्तर तपशील असा की, दत्तनगर येथील कुकुलोळ प्लॉटिंगमध्ये मुसाभाई हसन बागवान आपल्या कुटुंबासह वास्तव्यास आहेत. मुसाभाई यांचे दत्तनगरमधीलच एका महिलेशी प्रेमसंबंध होते. या कारणावरून घरात नेहमीच वाद होत असत. शुक्रवारी (दि. १ मे) सायंकाळी काही नातेवाईकांनी घरी येऊन मुसाभाई यांना त्यांच्या संबंधाबाबत समज देण्याचा प्रयत्न केला होता. यावेळी त्यांचा मुलगा अश्पाक यानेही वडिलांना समजावून सांगितले होते.

शुक्रवारी रात्री १०.४५ च्या सुमारास कुटुंबातील सदस्य जेवण करत असताना मुसाभाई घराबाहेर बाजेवर बसले होते. काही वेळाने ते घरात आले आणि अश्पाकशी वाद घालू लागले. सर्वांसमोर माझा विषय का काढला? अशी विचारणा करत त्यांनी अश्पाकशी हुज्जत घातली. रागाच्या भरात दोघांमधील वाद विकोपाला गेला. यावेळी अश्पाकने रागाच्या भरात किचनमध्ये जाऊन धारदार सुरा आणला आणि मुसाभाई यांच्यावर सपासप वार केले. यात गंभीर जखमी झालेले मुसाभाई रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर कोसळले.

वडिलांचा खून केल्यानंतर अश्पाकने पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने घरातील फरशीवर सांडलेले रक्त चादरीने पुसून घेतले आणि ती चादर व फरशी पाण्याने धुवून स्वच्छ केली. त्यानंतर जखमी अवस्थेत असलेल्या मुसाभाईंना साखर कामगार हॉस्पिटलमध्ये नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी शमशाद मुसाभाई बागवान यांनी दिलेल्या फिर्यादीवरून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हा रजिस्टर नं. ३१९/२०२६ नुसार भा.द.वि. कलम १०३(१), २३८(आ) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अश्पाक बागवान याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# पगार रखडले, पेन्शन थांबली; मनपा कर्मचाऱ्यांच्या न्यायासाठी राज्यभर एकजूट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राज्यातील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वेतन, पेन्शन आणि इतर प्रलंबित प्रश्नांनी आता गंभीर रूप धारण केले असून या पार्श्वभूमीवर राज्यभरातील कामगार संघटना एकवटल्या आहेत. महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघाच्या पुढाकाराने ९ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पुणे येथील श्रमिक भवन येथे राज्यस्तरीय महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीकडे राज्यातील हजारो महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले असून त्यांच्या प्रश्नांवर ठोस निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**९ मे रोजी पुण्यात राज्यस्तरीय बैठक; संघटनांचा एल्गार**

अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनने कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर होत नसल्याबाबत, तसेच विविध प्रलंबित प्रश्नांबाबत महासंघाचे सरचिटणीस कॉम्रेड उदय भट यांच्याकडे निवेदन सादर केले होते. या निवेदनाची गांभीर्याने दखल घेत महासंघाने तातडीने राज्यभरातील महानगरपालिका संघटनांना एकत्र येण्याचे आवाहन करत ही बैठक बोलावली आहे. यामुळे स्थानिक पातळीवरील प्रश्नांना आता राज्यस्तरावर मोठे व्यासपीठ मिळाले आहे. महासंघाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील 'ड' वर्ग महानगरपालिकांना जीएसटी (एलबीटी) अनुदान वेळेवर मिळत नसल्यामुळे आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. फेब्रुवारी २०२६ चे अनुदान उशिरा मिळाले, तर मार्च २०२६ चे अनुदान अद्याप प्राप्त झालेले नाही. त्यामुळे अनेक महानगरपालिकांची आर्थिक स्थिती डळमळीत झाली **(पान ४ वर)**

# अहिल्यानगरची 'सीना' नदी गटार बनली!

### 'ग्रीन सिटी' मोहिमेचा शुभारंभ : शहराच्या नियोजनासाठी अहमदाबादच्या संस्थेची मदत घेण्याचे निर्देश


**पालकमंत्री विखे पाटलांनी काढले वाभाडे**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरातून वाहणारी सीना नदी आज एका गटारात रूपांतरित झाली असून, त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाली आहेत. 'सरकारी जागा दिसली की त्यावर अतिक्रमण करायचे', अशी चुकीची वृत्ती शहरात बोकाळली आहे, अशा शब्दांत राज्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शहर प्रशासनावर आणि नियोजनावर कडक ताशेरे ओढले. शहराच्या पर्यावरणाचा बोजवारा उडाला असताना आता सीना नदीच्या 'ब्ल्यू' आणि 'रेड' लाईनमध्ये लक्ष घालणार असल्याचे संकेतही त्यांनी दिले.

साईद्वारका सेवा ट्रस्ट आणि अहिल्यानगर महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी' मोहिमेअंतर्गत एका वर्षात एक लाख वृक्षलागवडीचा शुभारंभ त्यांच्या हस्ते झाला. यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव आणि आयुक्त यशवंत डांगे आदी मान्यवर उपस्थित होते.





#### नियोजनाचा अभाव, शहराचे रूप बदलण्याची गरज

**शहराचा विस्तार होत असताना नियोजन मात्र पूर्णपणे कोलमडले आहे. पुण्यातील सांडपाणी पुनर्वापराचे उदाहरण देत त्यांनी अहिल्यानगरमधील पाण्याचा पुनर्वापर (ट्रीटमेंट प्लांट) होणे किती गरजेचे आहे. पुढील दहा वर्षांत शहराची रचना कशी असावी, याचे नियोजन करण्यासाठी महापालिकेने अहमदाबाद येथील तज्ज्ञ संस्थेला सल्लागार म्हणून नेमावे आणि शहराचे रूप पालटावे.**

**– राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री**

शहरात वाढते प्रदूषण ही मोठी चिंतेची बाब आहे. 'ग्रीन सिटी'सारख्या उपक्रमातून केवळ झाडे लावून चालणार नाही, तर प्रत्येक भागात 'ग्रीन स्पेसेस' विकसित करणे ही काळाची गरज आहे, असे त्यांनी अधोरेखित केले. जलसंपदा विभागामार्फत धरण, नदी आणि नाल्यांच्या परिसरातील सुमारे ५६ हजार एकर जमीन अतिक्रमणमुक्त केल्याचे सांगत, आता नदी स्वच्छ करण्यावर आणि अतिक्रमणे हटवण्यावर आपला भर असेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

अहिल्यानगर शहराला केवळ स्मार्ट बनवणे नव्हे, तर 'क्लीन अँड ग्रीन सिटी' ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे हे प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट असावे, असे आवाहनही पालकमंत्री विखे पाटील यांनी यावेळी केले. शहराच्या नियोजित विकासासाठी आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी प्रशासनाने आता कठोर भूमिका घेणे आवश्यक असल्याचे त्यांच्या या विधानातून स्पष्ट झाले आहे.



#### उपदेशाच्या पलीकडे..?

# इंदुरीकर महाराजांच्या मुलीच्या विवाह सोहळ्याची राज्यभर चर्चा : साधेपणा की थाट?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राज्यातील नामांकित कीर्तनकार आणि समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी नेहमीच आपल्या कीर्तनातून 'लग्न सोहळे साधे करा, दिखाऊपणा टाळा आणि पैशांचा अपव्यय थांबवा', असे परखड विचार मांडले आहेत. मात्र, ३ मे रोजी संगमनेर तालुक्यातील गुंजाळवाडी येथे होणाऱ्या त्यांच्या मुलीच्या विवाह सोहळ्यामुळे आता याच विचारांवर आणि महाराजांच्या स्वतःच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**एका बाजूला लग्नाची धामधूम आणि दुसऱ्या बाजूला उपदेशाचे 'आचरण' यावर होणारी ही चर्चा, हेच या विवाह सोहळ्याचे सध्याचे वास्तव आहे. आता या भव्यतेची चर्चा होणार की सामाजिक बांधीलकीची, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.**

गुंजाळवाडी शिवारात तब्बल १०० एकर परिसरात उभारलेला भव्य मंडप, हजारो लोकांची उपस्थिती आणि राजकीय-धार्मिक दिग्गजांची उपस्थिती, यामुळे हा सोहळा सध्या राज्यभर चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. एकीकडे गगनगिरी महाराज सप्ताहाचे ध्वजारोहण तर दुसरीकडे कन्येचा शाही विवाह, असा दुहेरी कार्यक्रम तिथे रंगत आहे.

साखरपुड्याच्या काळापासूनच या सोहळ्याच्या भव्यतेवर सोशल मीडियातून टीका होत होती. जे महाराज समाजाला साधेपणाचे धडे देतात, ते स्वतः मात्र भव्यता का दर्शवत आहेत? असा सवाल विचारला जात आहे. महाराजांनी यापूर्वी टीकाकारांना खडे बोल सुनावत 'लग्न जोरातच करणार' असे आव्हान दिले होते. मात्र, सामान्यांच्या वर्तुळातून आता एकच प्रश्न विचारला जात आहे – कीर्तनातून साधेपणाचा उपदेश देणारे महाराज या भव्यतेऐवजी एखादा मोठा सामाजिक उपक्रम हाती घेऊ शकले नसते का? पैशांचा दिखाऊपणा करण्यापेक्षा तोच पैसा समाजाच्या हितासाठी किंवा जनकल्याणासाठी वापरला असता, तर ते अधिक आदर्शवत ठरले असते, अशी भावना जनमानसात व्यक्त होत आहे. मोठेपणा माणसाच्या अंगी असावा, दिखाऊपणात नाही, हे महाराजांचेच शब्द आज त्यांच्याकडेच विचारले जात आहेत.

# २ हजार कोटींच्या थकबाकीमुळे 'ओंकार शुगर्स' अडचणीत!

### १७ कारखाने चालवणारे बाबुराव बोत्रे पाटील 'आऊट ऑफ कव्हरेज'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्रातील साखर उद्योगात अल्पावधीतच 'तारणहार' म्हणून नावारूपाला आलेल्या बाबुराव बोत्रे पाटील आणि त्यांच्या 'ओंकार शुगर्स' समूहावर सध्या गंभीर संकट ओढवले आहे. गेल्या एक-दीड वर्षात तब्बल १७ साखर कारखाने खरेदी करून किंवा भाडेतत्त्वावर चालवायला घेऊन साखर पट्ट्यात खळबळ उडवून देणाऱ्या बोत्रे पाटलांचे आर्थिक गणित कोलमडल्याची चर्चा आहे. शेतकऱ्यांचे तब्बल २ हजार कोटी रुपयांहून अधिक पेमेंट थकल्याने आता राज्यभरातील ऊस उत्पादक शेतकरी संताप व्यक्त करत आहेत.

बोत्रे पाटलांनी सुरुवातीला बंद पडलेले कारखाने सुरू करून शेतकऱ्यांना विक्रमी भाव देण्याचे आश्वासन दिले होते. यामुळे ते अल्पावधीत लोकप्रिय झाले.




मात्र, गेल्या जानेवारी महिन्यापासून परिस्थिती बदलली असून, त्यानंतर गाळप हंगाम संपेपर्यंत शेतकऱ्यांना पेमेंट मिळालेले नाही. ओंकार शुगर्सने साखर विक्रीतून मिळालेला पैसा शेतकऱ्यांना देण्याऐवजी इतर बुडीत कारखाने उभे करण्यासाठी वळवला असावा, असा संशय वर्तवला जात आहे.

या परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. पेमेंट वेळेत न मिळाल्याने अनेकांचे पीक कर्जाचे नियोजन विस्कळीत झाले असून, बँकांकडून अतिरिक्त व्याजाचा बोजा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, या गंभीर स्थितीत बोत्रे पाटील कोणाशीही संपर्कात नाहीत. त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, ते 'आऊट ऑफ कव्हरेज' असल्याचे समोर आले आहे.

शेतकऱ्यांच्या या थकीत पेमेंटचा प्रश्न आता गंभीर झाला असून, सहकार मंत्रालयाने या प्रकरणात हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. जर वेळीच उपाययोजना झाल्या नाहीत, तर शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.

#### श्रीगोंदा तालुक्यात हजारो ऊस उत्पादकांचे नुकसान

**श्रीगोंदा तालुक्यातील गौरी शुगर (युनिट नं. चार) आणि ओंकार शुगर नंबर सात (साजन शुगर) हे दोन कारखाने बाबुराव बोत्रे पाटील चालवतात. या दोन्ही कारखान्यांकडे हजारो उत्पादकांचे दहा हजार टना पेक्षा अधिक ऊस गाळप झाले. त्यातील बहुतांश उत्पादकांचे देणे अडकल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त आहेत.**

## संपादकीय

### 'धडाकेबाज' पोलीस अधीक्षकाची बदली कुणाच्या राजकीय सोयीसाठी?

महाराष्ट्र राज्य गृहविभागाने नुकताच राज्यातील २१ वरिष्ठ आयपीएस आणि राज्य पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा जो मोठा निर्णय घेतला, त्यात अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची बदली अत्यंत चर्चेचा विषय ठरली आहे. एका पोलीस अधिकाऱ्याची बदली ही प्रशासकीय प्रक्रियेचा भाग असते, हे जरी तांत्रिकदृष्ट्या सत्य असले, तरी अहिल्यानगरच्या बाबतीत हे प्रकरण केवळ एका बदलीपुरते मर्यादित राहिले नसून, त्याभोवती अनेक राजकीय आणि प्रशासकीय संशयांचे वलय निर्माण झाले आहे. सोमनाथ घार्गे यांची कारकीर्द ही नेहमीच 'अ‍ॅक्शन' आणि 'वाद' या दोन टोकांच्या मधोमध राहिली आहे. त्यामुळेच, अवघ्या वर्षभरात त्यांना येथून जावे लागल्याने जिल्ह्यात आता उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

सोमनाथ घार्गे यांची ओळख 'धडाकेबाज' अधिकारी अशी आहे. श्रीरामपूर उपविभागात काम करत असताना त्यांनी अण्णा लष्करे आणि जागीरदार टोळीचा केलेला बिमोड, त्यानंतर रायगड आणि छत्रपती संभाजीनगरमधील त्यांची कारकीर्द यावरून त्यांच्या कार्यपद्धतीची प्रचिती येते. जेव्हा त्यांना अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती मिळाली, तेव्हा सर्वांनाच त्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा होत्या. जिल्ह्यातील वाढते गुन्हेगारीचे प्रमाण, अवैध धंदे आणि गुंडांच्या फोफावलेल्या टोळ्यांना आळा घालण्यासाठी घार्गे यांच्यासारखा खंबीर अधिकारी हवा, असे चित्र निर्माण झाले होते. पदभार स्वीकारल्यापासून त्यांनी काही आक्रमक पावले उचललीही होती. अनेक कत्तलखाने बंद करणे, एमपीडीए कायद्याचा वापर करून गुंडांना जिल्ह्याबाहेर हद्दपार करणे, यांसारख्या कारवायांनी काही काळ गुन्हेगारी वर्तुळात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. एवढेच नव्हे, तर राज्यात गाजलेल्या अशोक खरात प्रकरणाच्या तपासातही त्यांचे विशेष पथक सक्रिय होते.

मात्र, एका बाजूला आक्रमक कारवाया होत असताना, दुसऱ्या बाजूला पोलीस प्रशासनाच्या प्रतिमेला तडे देणाऱ्या काही घटनांनी त्यांच्या कार्यकाळावर प्रश्नचिन्ह उभे केले. कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याचे यश हे त्याने हाताळलेल्या केसच्या निकालावर आणि त्याच्या यंत्रणेच्या पारदर्शकतेवर अवलंबून असते. दुर्दैवाने, घार्गे यांच्या कार्यकाळात त्यांच्याच स्थानिक गुन्हे शाखेतील एका कर्मचाऱ्याचा अमली पदार्थ (ड्रग्स) तस्करीतील सहभाग चव्हाट्यावर आला. हे प्रकरण केवळ जिल्हाभरच नव्हे, तर राज्याच्या अधिवेशनातही गाजले. ज्या गुन्हे शाखेने गुन्हेगारांचा बंदोबस्त करायचा, त्या शाखेतील कर्मचारीच जेव्हा गुन्हेगारीमध्ये सामील होतात, तेव्हा पोलीस दलाची विश्वासार्हता शून्यावर येते. या घटनेने प्रशासनाचे न भरून निघणारे नुकसान केले. यासोबतच, संगमनेर येथील अल्पवयीन मुलीवरील अ‍ॅसिड हल्ला आणि त्यातील आरोपींना पकडण्यात आलेले अपयश, तसेच सिस्पे व इतर कंपन्यांच्या आर्थिक घोटाळ्यांमधील तपासाची संथ गती, यांमुळे जनमानसात आणि राजकीय वर्तुळात नाराजीचे सूर उमटत होते.

आता प्रश्न उपस्थित होतो तो या बदलीच्या कारणांचा. प्रशासकीय नियमानुसार, एका अधिकाऱ्याचा कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वी जर त्याची बदली होत असेल, तर त्यामागे दोन मुख्य कारणे असतात. पहिले म्हणजे, कामाबद्दल असणारी असमाधानकारक कामगिरी आणि दुसरे म्हणजे, राजकीय दबाव किंवा लोकप्रतिनिधींशी झालेले मतभेद. अहिल्यानगरच्या बाबतीत पाहिले तर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या जाहीर नाराजीची चर्चा जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचली होती. शिर्डीतील कार्यक्रमात त्यांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीवर आणि तपासाच्या संथ गतीवर जी उघड टीका केली होती, ती घार्गे यांच्या बदलीची नांदी ठरली, असे मानण्यास वाव आहे. जेव्हा स्थानिक पालकमंत्री आणि जिल्हा पोलीस प्रमुख यांच्यात समन्वयाचा अभाव निर्माण होतो, तेव्हा प्रशासकीय गाडी रुळावरून घसरते, हेच या प्रकरणातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

काही तज्ज्ञांच्या मते, घार्गे यांना मिळालेले मुंबईतील 'सहाय्यक पोलीस महानिरीक्षक' हे पद हे एक प्रकारचे 'पार्किंग' आहे. त्यांच्या कारकीर्दीवर असलेल्या प्रश्नांमुळे त्यांना जिल्ह्याबाहेर काढणे आवश्यक होते, परंतु त्यांना थेट 'शिक्षा' न देता एका सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे, असेही राजकीय विश्लेषक मानत आहेत. मात्र, प्रश्न असा उरतो की, एका कर्तव्यदक्ष समजल्या जाणाऱ्या अधिकाऱ्याला वर्षभरातच आपली खुर्ची का गमवावी लागली? ही केवळ त्यांची वैयक्तिक चूक होती की, त्यांना मिळालेल्या राजकीय दबावाचा हा परिपाक होता?

आता नवीन पोलीस अधीक्षक म्हणून मुम्मका सुदर्शन यांनी सूत्रे हाती घेतली आहेत. मुम्मका सुदर्शन यांची ओळख ही 'धाडसी आणि शिस्तप्रिय' अधिकारी अशी आहे. त्यांचा नागपूर आणि परभणीतील कामाचा अनुभव पाहता, त्यांच्याकडून अहिल्यानगरकरांना खूप अपेक्षा आहेत. मात्र, त्यांच्यासमोर आव्हाने कमी नाहीत. पोलीस दलात शिरलेली दलालीची संस्कृती, तपासातील राजकीय हस्तक्षेप, आर्थिक गुन्ह्यांचे वाढते जाळे आणि सर्वसामान्यांचा पोलिसांवरील डळमळीत झालेला विश्वास, या सर्व बाबी त्यांना हाताळायच्या आहेत.

शेवटी, पोलीस अधीक्षक कोण असावा किंवा कोणाची बदली कधी व्हावी, हा राज्य सरकारचा अधिकार असला तरी, प्रशासकीय बदल्या या पारदर्शक असायला हव्यात. 'आक्रमक कारवाया कुणाच्या डोळ्यात खुपल्या' यापेक्षा 'कारवायांची गुणवत्ता कशी होती', हा प्रश्न महत्त्वाचा आहे. जर एखादा अधिकारी खरोखरच गुन्हेगारांविरुद्ध लढत असेल आणि त्याला राजकीय कारणांमुळे हलवले जात असेल, तर ती लोकशाहीसाठी घातक आहे. पण, जर अधिकारी स्वतःच्याच यंत्रणेवर नियंत्रण ठेवू शकत नसेल आणि त्याच्या कार्यकाळात गुन्हेगारीला मोकळे रान मिळत असेल, तर अशी बदली ही काळाची गरज ठरते.

सोमनाथ घार्गे यांची कारकीर्द ही 'एक पाऊल पुढे आणि दोन पावले मागे' अशी राहिली. त्यांच्या धडाकेबाज स्वभावाचा फायदा झाला, पण प्रशासकीय नियंत्रणाच्या अभावाने त्यांना अपयशी ठरवले. अहिल्यानगरच्या सुज्ञ जनतेला केवळ 'पोलीस अधिक्षक' बदललेले नकोत, तर 'पोलीस व्यवस्था' बदललेली हवी आहे. मुम्मका सुदर्शन यांच्या रूपाने जिल्ह्याला नवीन नेतृत्त्व मिळाले आहे. आता त्यांनी तरी जुन्या चुकांमधून धडा घेऊन, कोणाच्याही राजकीय दबावाला बळी न पडता, केवळ कायद्याचे राज्य प्रस्थापित करावे, हीच अपेक्षा आहे. पोलीस हे कोणाचे 'खाजगी अंगरक्षक' नसून ते कायद्याचे रक्षक आहेत, हे भान ठेवले तरच खऱ्या अर्थाने जिल्ह्याचा विकास आणि सुरक्षा शक्य आहे. अन्यथा, अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे हे चक्र असेच फिरत राहील आणि सामान्यांचे हाल मात्र कायम राहतील.

## महात्मा फुले कृषी विद्यापीठात महाराष्ट्र दिन उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : विद्यापीठाने संशोधन, शिक्षण व विस्तार या तीनही क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी केली आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाने संशोधनामध्ये गेल्या वर्षी शेतकऱ्यांना उपयोगी ठरणाऱ्या विविध पिकांच्या ७ वाणांची निर्मिती , ३ कृषि अवजारे व यंत्रांची निर्मिती व ५९ तंत्रज्ञान शिफारशी विद्यापीठाने दिल्या आहेत. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध कृषी महाविद्यालये, कृषी तंत्र विद्यालये याङरे दर्जेदार कृषी शिक्षणाचे काम सुरू आहे. कृषी विस्तार कार्यामध्ये आपण विविध उपक्रम आयोजित करत असतो. यावर्षी यामध्ये फुले कृषी महोत्सवाचे यशस्वी आयोजन केलेले आहे तसेच दहा जिल्ह्यांमध्ये मॉडेल व्हिलेज विकसित करण्याचा मानस आहे. विद्यापीठाने ६९०० क्विंटल बियाणे उत्पादन करून बीज्योत्पादनाच्या उद्दिष्टामध्ये मोठी प्रगती साधलेली आहे. यावर्षी एल नीनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहणार असल्याचे संकेत आहेत तरी या दृष्टीने आपल्या तंत्रज्ञानाच्या वापराने शेतीची उत्पादकता कशी वाढेल यासाठी विद्यापीठ सज्ज असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले.



महात्मा फुले कृषी विद्यापीठात ६७ वा महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता (कृषी) डॉ. सातापा खरबडे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, कुलसचिव राजेंद्रकुमार पाटील, विद्यापीठ अभियंता मिलिंद ढोके, नियंत्रक डॉ. बी. टी. पाटील, कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे व कृषी तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजू अमोलिक उपस्थित होते. विद्यापीठात झालेल्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमास विविध विभागांचे विभाग प्रमुख, अधिकारी, शास्त्रज्ञ, विद्यार्थी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरक्षा अधिकारी गोरक्षनाथ शेटे यांनी केले.

## ईव्हीएम स्ट्राँग रूमची पोलीस अधीक्षक सुदर्शन यांच्याकडून पाहणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : उद्या राहुरी नगर पाथर्डी मतदारसंघाचा निकाल जाहीर होणार असल्याने या मतपेट्या राहुरीतील कै. रामदास पाटील धुमाळ महाविद्यालयात ठेवण्यात आल्या असल्याने नुकतेच नव्याने हजर झालेले अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी ईव्हीएम स्ट्राँग रूमला भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत परंतु अचानक पोलीस अधीक्षकांनी दिलेल्या भेटीमुळे पोलीस प्रशासन काही काळ गोंधळून गेले होते. अचानक दिलेल्या या भेटीमुळे पोलीस यंत्रणेची धावपळ उडाली. मत पेट्या ठेवलेल्या ठिकाणी पोलीस अधीक्षकांनी पाहणी करून त्यामधील सुरक्षेला अधिक प्राधान्य देण्याचे सांगितले तसेच राहुरी नगर पाथर्डी मतदार संघातील परिस्थितीचा आढावा घेऊन कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. यावेळी श्रीरामपूर विभागाचे पोलीस उपअधीक्षक जयदत्त भवर यांच्यासह पोलीस निरीक्षक इमामूद्दीन पठाण, पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघमारे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मतमोजणीच्या दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांना सज्ज राहण्याचे व सुरक्षा व्यवस्थित कडेकोट ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.



## होमिओपॅथीच्या माध्यमातून कृषी संवर्धन व विषमुक्त शेती शक्य : डॉ. खेडकर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** :''होमिओपॅथिक उपचार पद्धती ही केवळ मानवी शरीरापुरती मर्यादित नसून, वनस्पतींची संतुलित वाढ आणि विषमुक्त अन्ननिर्मितीसाठी ती एक प्रभावी संजीवनी ठरू शकते. भविष्यात जमिनीचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी होमिओपॅथी हाच शाश्वत शेतीचा आधार असेल,'' असे प्रतिपादन प्रसिद्ध होमिओपॅथी तज्ज्ञ प्रा. डॉ. प्रकाश खेडकर यांनी केले. जागतिक होमिओपॅथी दिनानिमित्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या (नाशिक) 'आयुष' विभागातर्फे आयोजित 'हीलिंग विथ होमिओपॅथी' या राज्यस्तरीय चर्चासत्रात डॉ. खेडकर बोलत होते. ''शाश्वत शेतीसाठी होमिओपॅथी'' या विषयावर त्यांनी आपले प्रदीर्घ अनुभव आणि संशोधन यावेळी सादर केले.

या कार्यक्रमासाठी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, परीक्षा विभाग प्रमुख डॉ. संदीप कडू, होमिओपॅथी विभागप्रमुख डॉ. राजकुमार पाटील, मॅनेजमेंट कौन्सिल बोर्ड सदस्य डॉ. मनीष इनामदार आणि क्लीनिकल बोर्डाचे चेअरमन डॉ. आशिष भगत हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. आपल्या विवेचनात डॉ. खेडकर यांनी जमिनीचा पोत सुधारण्यामध्ये होमिओपॅथीच्या प्रभावी भूमिकेवर प्रकाश टाकला. रासायनिक शेतीला सक्षम पर्याय म्हणून होमिओपॅथीकडे पाहण्याची गरज असून, आगामी काळात कृषी क्षेत्रात या पॅथीच्या माध्यमातून मोठ्या संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.। चर्चासत्रासाठी महाराष्ट्रातील विविध होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजेसच्या विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## बारा इमाम पीर बाबांचा यात्रा उत्सव उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा फाटा** - नेवासा तालुक्यातील उस्थळ दुमाला ग्रामस्थांच ग्रामदैवत बारा इमाम पीर बाबाची यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या यात्रा उत्सवानिमित्ताने ग्रामस्थांसह परिसरातील हजारो भाविकांनी बाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.

उस्थळ दुमाला येथील हिंदू मुस्लिमांच ग्रामदैवत बारा इमाम पीर बाबाचा यात्रा उत्सव दरवर्षी सालाबाद प्रमाणे भरवण्यात येतो या उत्सवानिमित्त ग्रामस्थांसह परिसरातून हजारो भाविक बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी येत असतात त्याचबरोबर अनेक ग्रामस्थ आपल्या नवस्फूर्ती करण्यासाठी देखील मोठ्या प्रमाणात येत असतात या ठिकाणी नवस्फूर्ती करण्यासाठी बाबाच्या समाधी पर्यंत जाण्यासाठी असलेल्या २१ पायऱ्यांवर नारळ फोडून तसेच गुळाच्या शेरणीचा प्रसाद वाटप करून नवस्फूर्ती करण्याची अनोखी परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे.

या यात्रा उत्सवानिमित्ताने यात्रा कमिटीच्या वतीने देखील विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येतं यामध्ये भव्य कावड मिरवणूक छबिना हाजेऱ्या तसेच शोभेची दारू वीस व कुस्त्यांच्या हगाम्याला फाटा देऊन २० वर्षानंतर प्रथमच आर्केस्ट्राचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा यात्रा उत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यात्रा कमिटीचे अध्यक्ष मोहन सकट, बबन सुकाळकर , सोसायटीचे चेअरमन राजेंद्र गायकवाड, सरपंच किशोर सुकाळकर, भाऊसाहेब जाधव, बद्रीनाथ चिधे, संदीप निक्रड, भारत पीटेकर, संदीप काळे,अनिल सकट, प्रशांत सुकाळक, जनार्दन पिटेकर, मेजर संदीप सकट, अशोक





बर्डे , पंडित पीटेकर, विलास सकट, यांनी परिश्रम घेतले.

## उन्हाळ्याची तीव्रता वाढल्याने पुणतांबा परिसरातील जनजीवन विस्कळीत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : परिसरात गेल्या पाच दिवसांपासून उन्हाळ्याची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. हवामान खात्याने उष्णतेच्या लाटेचा इशारा दिल्यामुळे नागरिकांनी सकाळी १० नंतर घराबाहेर पडणे टाळले आहे. त्यामुळे मुख्य रस्त्यांवर दुपारच्या वेळेत शुकशुकाट दिसून येत आहे.

परिसरात तापमान सरासरी ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक नोंदविले जात असून त्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. परिणामी नागरिकांचे बाहेर पडण्याचे प्रमाण घटले असून शेतीची कामेही ठप्प झाली आहेत.

कडक उन्हामुळे पिण्याचे पाणी व भक्ष्याच्या शोधात वन्यप्राण्यांची भटकंती वाढली आहे. विहिरींच्या पाण्याची पातळी झपाट्याने कमी होत असून अनेक छोटे बंधारे कोरडे पडले आहेत. गोदावरी नदीवरील कोल्हापूर पद्धतीचा वसंत बंधाराही आटण्याच्या मार्गावर आहे.

उन्हाळ्याच्या झळांमुळे विवाह सोहळ्यांवरही परिणाम झाला आहे. अनेकांनी दुपारच्या ऐवजी सायंकाळचे मुहूर्त ठेवले आहेत, तर दुपारच्या विवाह समारंभात उपस्थिती कमी असल्याचे दिसून येत आहे. एकूणच वाढत्या उष्णतेमुळे परिसरातील जनजीवन ठप्प झाले आहे.

## श्रीरामपूर नगरपरिषदेकडून २५ लाखांचा दिव्यांग निधी वाटप

**श्रीरामपूर** : दिव्यांग बांधवांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी आपण सदैव कटिबद्ध असून त्यांच्या हक्कासाठी सातत्याने प्रयत्नशील राहू, असे प्रतिपादन आमदार हेमंत ओगले यांनी केले. श्रीरामपूर नगरपरिषदेच्या वतीने आयोजित दिव्यांग निधी वाटप कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमात आमदार ओगले यांच्या हस्ते सुमारे २५ लाख रुपयांचा निधी ५९६ दिव्यांग लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर थेट जमा करण्यात आला. वेळेत निधी वितरणाची प्रक्रिया पूर्ण केल्याबद्दल त्यांनी नगराध्यक्ष करण ससाणे व सहकाऱ्यांचे कौतुक केले.

नगराध्यक्ष करण ससाणे म्हणाले, समाजातील प्रत्येक घटकाच्या प्रश्नांसाठी नगरपरिषद कटिबद्ध आहे. आगामी काळात दिव्यांग बांधवांच्या उन्नतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील.




जिल्हाध्यक्ष सचिन गुजर यांनीही लाभार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी कार्यक्रमाचे आभार मानले.

यावेळी सभापती दिपक वमने, योगेश जाधव, नगरसेविका यास्मिन जावेद शेख, रवी खिलारी यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दिव्यांग बांधवांच्या वतीने मायाताई इंगळे, रूपाली नागरे, साहिल आंबेकर, ललिता ताथेड, दादाराम जाधव आदी लाभार्थी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना भालेरायवाडी शाळेत भावनिक निरोप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** :राहाता तालुक्यातील भालेरायवाडी हनुमंतगाव जि.प. प्राथमिक शाळा, भालेरायवाडी येथे इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.अ

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा गौरव करताना हा कार्यक्रम भावनिक आणि प्रेरणादायी ठरला.

यावेळी लक्षवेधी परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या अवनी ब्राह्मणे,प्रथमेश कानडे या गुणवंत वि९ द्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

वेळी इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा शाळेचे मुख्याध्यापक अनिल डिंबर व शिक्षक वृंद यांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देऊन त्यांचा विशेष गौरव केला. कार्यक्रमप्रसंगी उपसरपंच प्राजक्ता अनाप,माजी सरपंच गोरक्षनाथ



ब्राह्मणे,राजभोज,संतोष कानडे शब्बीर शेख,विकास पाबळे तसेच महिला पालक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक अनिल डिंबर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की विद्यार्थ्यांनी या शाळेतून गेल्यानंतर मोठे होऊन आई-वडील शाळा शिक्षक व गावाचे नावलौकिक केले पाहिजे.

शाळेच्या वतीने उपस्थित सर्वांना भोजन देण्यात आले. कार्यक्रमास उपसरपंच प्राजक्ता अनाप,सदस्य रूबीना शेख,गोरक्षनाथ ब्राम्हणे,बाबुराव गावडे,लक्ष्मण अनाप,संतोष कानडे,किरण गावडे,अतुल कुलकर्णी,डॉ मच्छिंद्र कोकणे, पत्रकार संदिप गावडे तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष ज्ञानदेव अनाप यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एचएससी परीक्षेत टाकळीभानच्या ज्यूनियर कॉलेजचे सुयश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अटाकळीभान** : रयत शिक्षण संस्थेच्या टाकळीभान येथील न्यू इंग्लिश स्कूल व आण्णासाहेब पटारे पाटील ज्यूनियर कॉलेजचा एच .एस .सी . मार्च २०२६ परीक्षेत वाणिज्य शाखेचा ९४.७३ टक्के तर कला शाखेचा ६२ .१६ टक्के निकाल लागल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक आर .एम .शिंदे यांनी दिली आहे.

वाणिज्य शाखेमध्ये वैष्णवी दत्तात्रय मुठे या विद्यार्थिनीने ८०.८३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक, दिशा भारत गुंजाळ या विद्यार्थिनीने ८०.१७ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक, प्रतिक्षा रोहिदास बिरसणे या विद्यार्थिनीने ७९.६७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे तर कला शाखेमध्ये वैष्णवी बापुसाहेब सपकाळ हिने ६९ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक, हुमेरा इमाम शेख या विद्यार्थिनीने ६७.६७ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर भारती दादासाहेब सावंत या विद्यार्थिनीने ६० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे.

## नेवासा नगरपंचायतमध्ये राष्ट्र पुरुषांना अभिवादन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा नगरपंचायतमध्ये महाराष्ट्रासाठी योगदान देणाऱ्या राष्ट्र पुरुषांना अभिवादन व कामगारांचा सन्मान करत महाराष्ट्र दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले पाटील यांच्या हस्ते सर्व नगरसेवक, अधिकारी कर्मचारी व नागरीकांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज व बुद्ध जयंती निमित्ताने भगवान गौतम बुद्धांच्या प्रतिमेचे पूजन यावेळी करण्यात आले.

नेवासा नगरपंचायतमध्ये महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त महाराष्ट्र दिन साजरा करत असताना महाराष्ट्राची समृद्ध परंपरा जपणे,ज्या ज्या महानुभावांनी महाराष्ट्रासाठी योगदान ते एस एम जोशी,आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, सेनापती बापट, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, श्रीपाद डांगे, केशवराव जेधे, माधवराव बागल,



भाई उद्धवराव पाटील शाहीर अमर शेख ,शाहीर गव्हाणकर शाहीर आत्माराम पाटील आदींचे तसेच संयुक्त महाराष्ट्रासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांचे स्मरण करून गौरवशाली महाराष्ट्र घडवला अशा मान्यवरांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करून ध्वजारोहण करण्यात आले.

जागतिक कामगार दिन याच दिवशी असल्याने नेवासा शहरात ज्यांनी आपलं अख्ख आयुष्य काम करण्यात वेचलं, प्रामाणिकपणे काम करत नेवासा शहराची भरभराट होण्यासाठी योगदान दिले अशा ६७ कामगारांचा यावेळी फेटा घालून व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

यामध्ये दगड घडाई कामगार, पाथरवट, टापकर, गटई कामगार, टेलरिंग कामगार, रिक्षा ड्रायव्हर, कापड दुकानदार, किराणा दुकानदार,मेडिकल स्टोअर चालक,हलवाई या ठिकाणी असलेले कामगार, हॉस्पिटल मध्ये असलेले कामगार, स्वच्छता कामगार, पाणीपुरवठा कामगार,पेपर विक्रेते कामगार,मेकॅनिक कामगार, नाभिक कामगार अशा काही निवडक मान्यवर कामगारांचा समावेश होता.

यावेळी झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रम प्रसंगी नगरपंचायतचे कार्यालयीन अधीक्षक सागर झावरे, उपनगराध्यक्ष शालिनीताई सुखदान,नगरसेविका सौ.जयश्रीताई शिंदे,गटनेते नगरसेवक महेश लोखंडे, जितेंद्र कुऱ्हे,अंकुश म्हस्के,प्रवीण आप्पा सरोदे, जालिंदर गवळी,निरंजन डहाळे,दिनेश व्यवहारे,कृष्णा परदेशी संदीप सरकाळे यांच्या सह कामगार नेते अनिल सोनवणे, मूर्तीकार बजरंग इरले,लक्ष्मण चांदणे,अशोक डौले, अशोक चौधरी,राजकुमार शेंडे,राजू परदेशी, विजय कापसे या कामगारांसह अनेक कामगार आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सुधीर चव्हाण यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विश्वास वाघमारे,सागर पवार,गौरव जाधव, अनिकेत ढोकणे,उदय सुसे यांनी विशेष प्रयत्न केले.

## आदिक यांच्या पुढाकारातून कामधेनू गोशाळेस 'सौर' आधार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तिनवाडी, हरेगाव येथील नारिशक्ती ट्रस्ट संचलित 'कामधेनू गोशाळा'स सोलर सिस्टिम बसविण्यासाठी लिनेस क्लब ऑफ श्रीरामपूर व माजी नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक यांच्या पुढाकारातून रोख स्वरूपात मदत देण्यात आली. ही मदत मिनल फुलवर (अध्यक्षा) व सोनवणे (सेक्रेटरी) यांच्या हस्ते गोशाळेचे प्रतिनिधी गोर्डे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. कामधेनू गोशाळेत गावरान गायींचे संगोपन अत्यंत व्यवस्थित पद्धतीने केले जात असून, जनावरांच्या चारा, पाणी आणि स्वच्छतेची विशेष काळजी घेतली जाते. सौरऊर्जेच्या माध्यमातून गोशाळेच्या दैनंदिन कामकाजाला अधिक गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. यावेळी अनुराधाताई आदिक यांनी गोसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत, गोधनाचे संरक्षण ही केवळ परंपरा नसून सामाजिक जबाबदारी आहे. अशा उपक्रमांना सर्वांनी पुढाकाराने मदत करावी, असे आवाहन केले. या प्रसंगी आदित्य आदिक, अनिरुद्ध भिंगारवाला आदी उपस्थित होते. ग्रामीण भागातील पर्यावरणपूरक आणि शाश्वत उपक्रमांना मिळणारे हे पाठबळ सकारात्मक बदलाची नांदी ठरत असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९७.२३ टक्के

**श्रीरामपूर** : प्रवरानगर येथील महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता बारावी वर्गाचा विज्ञान शाखेचा निकाल ९७.२३ टक्के तर कला शाखेचा निकाल ९२.८६ टक्के लागला आहे. एच एस सी बोर्ड परीक्षा २०२६ चा ऑनलाईन निकाल नुकताच जाहीर झाला असून प्रवरानगर येथील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी आपली निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. विज्ञान शाखेत अनुक्रमे प्रिया शरद ठोंबरे ८८.१७ टक्के, गायत्री योगेश थेटे ८६.१७ टक्के तर श्रुती प्रकाश पवळ ७८.५० टक्के गुण मिळाले आहेत तर कला शाखेत अनुक्रमे मानसी लक्ष्मण चेचरे ६१.१७ टक्के, सौरभ रोहिदास गरगडे ५५.८३ टक्के तर काजल राजू बर्डे ५४.८३ गुण मिळून प्रथम आली आहेत. या यशस्वी विद्यार्थ्यांचे रावसाहेब म्हस्के, अरुण कडू, एकनाथ घोगरे, प्राचार्य विनायक मेथवडे, मुख्याध्यापिका नलिनी जाधव, उपमुख्याध्यापक दिलीप डहाळे, उपप्राचार्य संजय डुबे, पर्यवेक्षिका संगीता सांगळे, विभागप्रमुख डॉ. शरद दुधाट, बाबासाहेब अंत्रे यासह सर्व शिक्षक बंधूभगिनी, पालक व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.

## पुणे-दानापूर अमृत भारत रेल्वेला बेलापूर स्थानकावर थांबा मंजूर

**श्रीरामपूर** : पुणे-दानापूर साप्ताहिक अमृत भारत रेल्वेला श्रीरामपूर (बेलापूर) रेल्वे स्थानकावर थांबा मंजूर करण्यात आला आहे. खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी हा निर्णय घेतल्याची माहिती श्रीरामपूर प्रवासी संघटनेचे अध्यक्ष रणजीत श्रीगोड यांनी दिली. या गाडीची घोषणा झाल्यानंतर बेलापूर स्थानकावर थांबा नसल्याने प्रवाशांमध्ये नाराजी होती. दूरच्या प्रवासासाठी या गाडीचा मोठा उपयोग होणार असल्याने प्रवासी संघटनेने खासदार वाकचौरे व रेल्वेमंत्र्यांकडे थांब्याची मागणी केली होती. त्यानंतर हा थांबा मंजूर करण्यात आला. ट्रेन क्र. ११४३१ पुणे-दानापूर ही गाडी प्रत्येक शनिवारी दुपारी ३.३० वाजता पुण्याहून सुटून सोमवारी पहाटे १.३० वाजता दानापूर येथे पोहोचेल. तर ट्रेन क्र. ११४३२ दानापूर-पुणे सोमवारी पहाटे ३.३० वाजता सुटून मंगळवारी सकाळी ११.०५ वाजता पुण्यात पोहोचेल. या गाडीला दौंड, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, इटारसी, जबलपूर, प्रयागराज, बक्सर, आरा आदी स्थानकांवर थांबे देण्यात आले असून लवकरच आरक्षण सेवा सुरू होणार आहे.

## डॉ. दर्शना गुंदेचा एमबीबीएस परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



**श्रीरामपूर** : येथील जैन समाजातील ज्येष्ठ मार्गदर्शक व होलसेल पुस्तक विक्रेते रमेश रतनचंद गुंदेचा व अलका रमेश गुंदेचा यांची नात डॉ. दर्शना अमोल गुंदेचा हिने सुमनदीप विद्यापीठ, वडोदरा येथील एसबीकेएस वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली आहे. ती अमोल रमेश गुंदेचा व अर्चना अमोल गुंदेचा यांची कन्या असून सचिन एजन्सी व रमेश बुक स्टॉलचे संचालक सचिन रमेश गुंदेचा व रुपाली सचिन गुंदेचा यांची पुतणी आहे. तिचे प्राथमिक शिक्षण भि.रा. खटोड कन्या विद्यालय, श्रीरामपूर येथे झाले. तर महाविद्यालयीन शिक्षण रामराव आदिक पब्लिक स्कूल, निपाणी वडगाव येथे पूर्ण झाले. त्यानंतर वडोदरा येथील एसबीकेएस वैद्यकीय महाविद्यालयातून तिने वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. नियमित अभ्यास, जिद्द व मेहनतीच्या जोरावर तिने हे यश संपादन केले. तिच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## लोणी येथे मंगळवारी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या ९४ व्या जयंतीनिमित्त मंगळवार (दि.५ मे) रोजी लोणी येथील पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अहिल्यानगर आणि प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, प्रवरानगर यांच्या संयुक्त विद्यमाने हा मेळावा होणार आहे. युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा' राबविण्यात येत आहे.

मेळाव्यात टोयोटा किर्लोस्कर मोटार प्रा. लि. यांच्या माध्यमातून 'कमवा व शिका' योजनेंतर्गत उमेदवारांना दोन वर्षांचे प्रशिक्षण व एक वर्षाचा औद्योगिक अनुभव दिला जाणार आहे. निवड झालेल्या उमेदवारांना विद्यावेतनही मिळणार आहे. दहावी, बारावी, बीए, बीकॉम, बीएस्सी उत्तीर्ण व १८ ते २१ वयोगटातील युवक पात्र राहतील. इच्छुकांनी ५ व ६ मे रोजी सकाळी १० वाजेपर्यंत महाविद्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मंडप व्यवसायकाच्या मुलीने खाकीचे स्वप्न सत्यात उतरविले



**राहुरी** : राहुरीशहरातील सोनार गल्ली येथील जुन्या पिढीतील पेंटर म्हणून नामवंत असलेले सोनार मंडपवाले म्हणून ओळखले जाणारे अर्जुन गजानन बुऱ्हाडे यांची मुलगी कु. वृषाली हिने पुणे शहर पोलीस दलात आपल्या कर्तृत्वावर व कष्टाने पोलीस दलातील परीक्षेत उत्तम प्रकारे यश संपादन करून आपली जागा निश्चित केली आहे.या परीक्षेत मैदानी चाचणीत तिने ४४ तर लेखी परीक्षेत ८८ असे एकूण १३२ गुण मिळवून ओबीसी प्रवर्गाचे मेरिट तोडून तिची ओपन मध्ये निवड झाली त्यामुळे तिचे कौतुक करण्यात येत आहे.

वृषालीचे बारावी पर्यंतचे शिक्षण राहुरीतील कै. लालाशेठ बिहाणी विद्या मंदिर प्रशाला येथे झाले. दहावीला ८५% व १२ वी शास्त्र विभागात ६२% गुण मिळविले. बऱ्याचदा १२ वी शास्त्र केल्यानंतर मेडिकल व इंजिनिअरिंगकडे विद्यार्थ्यांचा कल असतो. परंतु आपल्या मुलीने पोलीस व्हावे असे वडिलांचे स्वप्न होते व हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी ती मैदानात उतरली. राहुरी फॅक्टरी येथील मेजर राजेंद्र कडू यांच्या कर्मवीर अकॅडमीमध्ये तिने प्रवेश घेतला. मैदानी खेळ, व्यायाम यांची पार्श्वभूमी नसतानाही दिवस-रात्र मेहनत करून या यशाला गवसणी घातली. या यशात आई-वडिलांची साथ, आजोबा कै. गजानन बुऱ्हाडे यांचे आशीर्वाद तिला लाभले आणि तिच्या या यशाला कर्मवीर अकॅडमीचे शिक्षक मेजर राजेंद्र कडू व ज्योती कडू यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# कोपरगाव शहराची गरज न ओळखता बस स्थानक केले : आ. आशुतोष काळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : डॉक्टरला पेशंटची नस ओळखता आली तर उपचार व्यवस्थित होतात आणि लोकप्रतिनिधींना जर नागरिकांची गरज ओळखता आली तर विकास व्यवस्थित होतो.मात्र कोपरगाव बस स्थानक उभारतांना कोपरगाव शहराचा विचार केला गेला नाही. छोट्या मोठ्या व्यावसायिकांना व्यवसायाच्या संधी देता येतील याचा विचार करण्यात आला नाही व प्रवाशांना चांगल्या प्रकारे सोयी सुविधा कशा देता येतील हे अपेक्षित असतांना याचा कुठेही विचार करण्यात आला नाही.



त्यामुळे कोपरगाव शहर, प्रवाशी व व्यावसायिक यांची नेमकी गरज न ओळखता झालेले काम म्हणजे कोपरगाव बसस्थानक असल्याची कडवट टीका आमदार आशुतोष काळे यांनी मा.आ. कोल्हे यांचेवर नाव न घेता केली आहे. आ. आशुतोष काळे यांच्या प्रयत्नांतून मिळालेल्या ०५ कोटी रुपयांच्या निधीतून महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत कोपरगाव बस डेपो परीसरातील काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावरच न थांबता भविष्यात इलेक्ट्रिक बसेसची वाढती संख्या लक्षात घेऊन या बसेस चार्जिंगसाठी आवश्यक असणारे चार्जिंग स्टेशन देखील कोपरगाव बस स्थानकासाठी मंजूर करून आणले आहे. चार्जिंग स्टेशनच्या कामात देखील अनंत अडचणी आल्या.

मात्र अडचणींवर मात करून काम वेगाने पुढे जात असून चार्जिंग स्टेशन, काँक्रिटीकरण व बस डेपोसाठी २० कोटीपेक्षा जास्त निधी दिला. मात्र दुसरीकडे बस स्थानकाच्या परीसरातील खड्यातून जातांना माझ्या गाडीचा फोटो दाखवता मग हे पाप कुणाचे असा कडवट सवाल आमदार आशुतोष काळे यांनी मा.आ.कोल्हे यांचे नाव न घेता यावेळी विचारला. विकासाचे प्रश्न अडचणी अत्यंत असल्या तरी मला दिलेल्या संधीतून शक्य होईल तेवढ्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला आहे आणि यापुढेही करणार आहे. मूलभूत गरजा आणि प्रश्न भरपूर आहेत परंतु यापलिकडे जाऊन रोजगार उपलब्धतेसाठी प्रयत्न करीत आहे. कोपरगाव शहरात अधिकचा रोजगार उपलब्ध होऊन जास्तीत जास्त नागरिक वास्तव्यासाठी व नवीन उद्योग व्यवसाय कोपरगाव शहरात तेव्हा येतील जेव्हा आपल्याकडे इन्फ्रास्ट्रक्चर व्यवस्थित असेल तरच उद्योग व्यवसाय येतील आणि जास्तीत जास्त नागरिक येतील.त्यामुळे उद्योग व्यवसायासाठी अपेक्षित इन्फ्रास्ट्रक्चर आणि नागरीकांना कोपरगाव शहरात येण्यासाठी आवश्यक सोयी सुविधा कशा निर्माण करता येतील यासाठी प्रयत्न करीत आहे.

व्यापारी संकुल काम पूर्ण होत असून अजून एक मजला वाढवून मिळावा अशी मागणी केली आहे. यावेळी बस आगार व्यवस्थापक अमोल बनकर, बस स्थानक व्यवस्थापक अमित हम्पे, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, मनोहर कृष्णानी, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुधाकर रोहोम, डॉ.चंद्रशेखर आव्हाड, सुरेश कातकडे, नगरसेवक मंदार पहाडे, मेहमूद सय्यद, राजेंद्र वाकचौरे, जनार्दन कदम, वाल्मिक लहिरे, विजय त्रिभुवन, इम्तियाज अत्तार, राहुल शिरसाठ, बाळासाहेब रुईकर, माजी नगरसेवक विरेन बोरावके, रमेश गवळी, फकीर कुरेशी, अजीज शेख, सुनिल फंड, सागर आहेर, शुभम काळे, चंद्रकांत धोत्रे, अमित आगलावे, गणेश बोरुडे, शिवाजीराव कुऱ्हाडे, राजेंद्र जोशी, अभियंता बायजित पठाण, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अधिकारी,कर्मचारी आदी उपस्थित होते.

## एमपीएससीत संगमनेर तालुक्याच्या १४ विद्यार्थ्यांची पीएसआयपदी निवड



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : तालुक्यातील १४ विद्यार्थ्यांनी एमपीएससी स्पर्धा परीक्षेत यश मिळवत पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पदावर निवड मिळवली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेले हे यश संपूर्ण तालुक्यासाठी अभिमानास्पद असल्याचे मत डॉ. जयश्रीताई थोरात यांनी व्यक्त केले. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात नवनाथ ढवळे, सचिन दिघे, महेश बोऱ्हाडे, रुपेश वाकचौरे, सुरज शेरमाळे, चेतन घाणे, सुनिता धुळगंड, रमेश पवार, निवृत्ती गुळवे, सचिन बर्डे, सागर बटवाल, संतोष सागर, अक्षय फापाळे आणि वैशाली पन्हाळे यांची निवड झाली.

या सर्व विद्यार्थ्यांचा डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी नव्या पिढीने या विद्यार्थ्यांचा आदर्श घ्यावा, प्रामाणिकपणे कर्तव्य बजावत तालुक्याचा लौकिक वाढवावा, असे आवाहन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे बाळासाहेब थोरात, डॉ. सुधीर तांबे, सत्यजित तांबे व अन्य मान्यवरांनी अभिनंदन केले.

## विखे पाटील कारखान्यात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा गौरव सोहळा



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : प्रवरा सहकार, औद्योगिक व शैक्षणिक समूहाच्या उभारणीत कामगारांचे योगदान अत्यंत मोलाचे असून प्रवरेचा कामगार हा आपल्या संस्थेचा अभिमान आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के यांनी केले. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्यात महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त आयोजित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या गौरव सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी भाजप प्रदेश उपाध्यक्ष तथा कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे, व्हा. चेअरमन सोपानराव शिरसाठ, ज्ञानदेव आहेर, कार्यकारी संचालक महेश कोनापुरे, संचालक मंडळ व कामगार उपस्थित होते.

म्हस्के पाटील म्हणाले, कोणतीही संस्था कामगारांच्या कष्टांवर उभी असते. सेवानिवृत्तीनंतरही आनंदी जीवन जगावे, सामाजिक कार्यात सहभागी व्हावे व कुटुंबाला वेळ द्यावा. डॉ. सुजय विखे यांनी सांगितले की, प्रवरेच्या वाटचालीत कामगारांचे योगदान निर्णायक राहिले असून त्यामुळेच 'प्रवरा पॅटर्न'ला राज्यभर वेगळी ओळख मिळाली. साखर उद्योगासमोर अनेक आव्हाने असली तरी कामगारांच्या हिताला बाधा येऊ दिली जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. आभार संचालक अशोक घोलप यांनी मानले.

# माका येथील नारळी सप्ताहाची उत्सहात सांगता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील माका येथे अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात सुरु असलेल्या शृंगऋषीगडाच्या दुसऱ्या 'नारळी सप्ताहाची' सांगता सुरेशानंद शास्त्री महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने मोठ्या उत्साहात करण्यात आली. यावेळी काल्याचे कीर्तन सादर करताना शास्त्रीजींनी आपल्या ओघवत्या शैलीत भगवंताच्या बाललीलांचे आणि काल्याचे महत्त्व विशद केले.



येथे सात दिवस अखंड हरिनाम जप, ज्ञानेश्वरी पारायण, श्रीमद् भागवत कथा, किर्तन महोत्सव असे अनेक धार्मिक कार्यक्रम पार पडले. परिसरातील हजारो भाविकांनी दर्शनासाठी आणि श्रवणासाठी गर्दी केली होती. कीर्तनानंतर दहीहंडी फोडण्यात आली आणि त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी आमदार सुरेश आण्णा धस यांनी हेलिकॉप्टरद्वारे शृंगऋषीगडावर, महंत सुरेशानंद महाराज शास्त्री व हजारो भाविक भक्तांवर फुलांचा वर्षाव करून आगळावेगळा सन्मान केला.

या सोहळ्यासाठी आ. सुरेश धस, आ. विठ्ठल लंघे, अहिल्यानगरच्या महापौर ज्योतीताई गाडे, भारत शिंगाडे, भाजप नेते नवनाथ पडळकर, पाथर्डी नगराध्यक्ष अभय आव्हाड, स्नेहाताई सोनकाटे, जिल्हा परिषद सदस्य राहुल राजळे, रामहरी महानोर, जि प सदस्य भाजप ता.अध्यक्ष गावडे, युवा उद्योजक पिंटू खेडकर, अँड. सचिन कोळेकर आदी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. सुरेश धस यांनी पुढील वर्षी २०२७ मध्ये होणाऱ्या तिसऱ्या नारळी सप्ताहाचे नारळ महंत महाराजांकडून स्वीकारून कार्यक्रमाची अधिकृत घोषणा केली. सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी गड समितीचे पदाधिकारी, स्वयंसेवक आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल'च्या जयघोषात या सोहळ्याची सांगता झाली.

## प्राईड अकॅडेमी ज्यु. कॉलेजचा निकाल १०० टक्के

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : माऊली प्रतिष्ठान चॅरिटेबल ट्रस्ट संचलित प्राईड अकॅडेमी इंग्लिश मेडीअम स्कूल व ज्युनिअर कॉलेज, भेर्डापूर-वांगी महाविद्यालयाचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा इयत्ता १२ वी चा निकाल १०० टक्के लागला आहे. महाविद्यालयातून १२ वी सुटणाऱ्या विद्यार्थ्यांची ही सहावी बॅच होती. महाविद्यालयात विज्ञान शाखेमध्ये ८५.१७ टक्के गुण मिळवून ऋशांक योगेश वाकचौरे याने प्रथम क्रमांक पटकावला असून ८४.३३ टक्के गुण मिळवत कृष्णा नितिन हार्दे याने द्वितीय तर ७९.५ टक्के गुण मिळवून भाग्यश्री नानासाहेब सिन्नरकर आणि पुनित किशोर कंट्रोड यांनी तृतीय क्रमांक मिळविले. माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक माऊली मुरकुटे व प्राईड अकॅडेमीच्या संस्थापिका वंदनाताई मुरकुटे यांनी यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

## श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाची निकालाची परंपरा कायम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : मुळा एज्युकेशन सोसायटीच्या श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाने इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षेची निकालाची परंपरा कायम ठेवली असुन याही वर्षी महाविद्यालयाचा निकाल उत्कृष्ट लागला आहे. कला शाखा ७७.३९%, वाणिज्य शाखा ८८.७५%, विज्ञान शाखा- ९५.७०% असा निकाल लागला आहे. महाविद्यालयात तीन ही शाखेत प्रथम क्रमांक मिळवून मुलींनीच बाजी मारली आहे.

कला शाखेत कु. आकांक्षा किशोर चक्रनारायण हिने ७९.५०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. वाणिज्य शाखेत कु.गौरी संदीप पिटेकर हिने ७४.३३% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. तर विज्ञान शाखेत कु. आकांक्षा सुधीर बनसोडे हिने ८९.३३ % गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. याही वर्षी प्रथम क्रमांक मिळवून महाविद्यालयात मुलींनीच बाजी मारली आहे.

या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक माजी खासदार यशवंतराव गडाख, अध्यक्ष प्रशांत पाटील गडाख, उपाध्यक्ष उदयनदादा गडाख,सचिव उत्तमराव लोंढे, सह सचिव डॉ. विनायक देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण घनवट,उपप्राचार्या राधाताई मोटे,महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद, कार्यालयीन सेवक वृंद, पालक, सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी आदिंनी अभिनंदन केले आहे.

## महाराष्ट्र दिनी म्हैसगाव ग्रामपंचायतीकडून सायंकाळी राष्ट्रध्वज उतरविण्याचा विसर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील पश्चिम भागातील म्हैसगाव ग्रामपंचायतीकडून १ मे २०२६ रोजी फडकविण्यात आलेला राष्ट्रध्वज वेळेत उतरविण्याचा विसर पडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून ग्रामपंचायतीच्या या भोंगळ कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्त सकाळी ग्रामपंचायत कार्यालयात राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. मात्र सायंकाळ उलटून गेल्यानंतरही ध्वज खाली उतरविण्यात आला नाही.

रात्री उशिरा एका जागरूक नागरिकाच्या ही बाब लक्षात आल्यानंतर संबंधितांना याची माहिती देण्यात आली. त्यानंतर अंधारात मोबाईलच्या टॉर्चच्या प्रकाशात घाईगडबडीत ध्वज उतरविण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे ग्रामपंचायतीची प्रतिमा मलिन झाली असून हा राष्ट्रध्वजाचा अवमान की प्रशासनाचा निष्काळजीपणा, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, या प्रकरणी जबाबदार व्यक्तींवर कारवाई होणार का, की प्रकरण दडपले जाणार, याबाबत गावात चर्चा रंगली आहे. राष्ट्रध्वजाचा सन्मान राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याने संबंधित दोषींवर तातडीने योग्य कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## महाराष्ट्र दिनी कामगारांचा आ. लंघे यांच्या हस्ते सन्मान



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासा तहसीलच्या वतीने महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त तहसील कार्यालय प्रांगणात मुख्य ध्वजारोहण कार्यक्रम आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या हस्ते पार पडला. यावेळी विविध क्षेत्रात कार्यरत ६७ कामगारांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात 'वंदे मातरम्'ने झाली. त्यानंतर ध्वजारोहण करून राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले. नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस परेडचे संचलन करण्यात आले. तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी आमदार लंघे पाटील यांनी कामगारांना फेटा बांधून व गुलाबपुष्प देऊन गौरव केला. तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमास नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, उपनगराध्यक्षा शालिनीताई सुखदान, उपजिल्हाधिकारी सोनाली मात्रे, बाळासाहेब कासार, चांगदेव बोरुडे, सुदर्शन दुर्योधन, धनंजय हिरवे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन पत्रकार सुधीर चव्हाण यांनी केले.

## शिरसगाव येथे भगवान गौतम बुद्धांची जयंती साजरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : तालुक्यातील शिरसगाव येथे बुद्ध वंदना गाऊन भगवान गौतम बुद्धाची बुद्ध जयंती साजरी करण्यात आली.भगवान गौतम बुद्धाचे विचार अंगिकारल्यास जगात शांतता नांदेल,आजच्या परिस्थितीत युद्धाची नव्हे तर बुद्धांच्या विचारांची गरज असल्याचे प्रतिपादन रत्नमालाताई लंघे यांनी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी बोलतांना केले. शिरसगाव येथे झालेल्या कार्यक्रम प्रसंगी आयोजक बहुजन चळवळीतील नेते सुनील वाघमारे यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले तर अमोल मोरे यांनी प्रास्ताविक केले.यावेळी योहान वाघमारे व सावित्रीबाई वाघमारे, सुनील वाघमारे व मंगलताई वाघमारे यांनी बुद्ध वंदना म्हटली,यावेळी लंघे ताईंच्या हस्ते भगवान गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मेणबत्त्या पेटवून व पुष्पांजली अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाप्रसंगी हरीचंद्र लंघे,सुनील लंघे, पांडुरंग लंघे,ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब आगळे, बाळासाहेब देशमुख, बाळासाहेब केदारे, सचिन लंघे, दिलीप दराडे, डॉ. बाळासाहेब पडघन, दीपक आगळे, दिलीप खंडागळे,शिवाजी पोटे, आनंद वाकडे,कडूबाळ गायकवाड,संतोष खंडागळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. बुद्ध जयंती निमित्ताने अनेक मान्यवरांनी येथे भेटी देऊन भगवान गौतम बुद्धाच्या मूर्तीचे मेणबत्त्या व पुष्पांजली अर्पण करून दर्शन घेतले.

## पान १ वरुन

### पगार रखडले, पेन्शन थांबली; मनपा कर्मचाऱ्यांच्या न्यायासाठी राज्यभर एकजूट

काम करूनही वेळेवर वेतन मिळत नसल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, आरोग्य खर्च आणि दैनंदिन गरजा भागवताना कर्मचाऱ्यांची मोठी कसरत होत आहे. या परिस्थितीत राज्यातील सर्व महानगरपालिका कामगार संघटनांनी एकत्र येऊन यावर ठोस भूमिका घेणे अत्यावश्यक बनले आहे.

या पार्श्वभूमीवर पुण्यात होणाऱ्या बैठकीत विविध महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा होणार आहे. विशेषतः मुख्यमंत्री यांची भेट घेऊन निवेदन सादर करणे, शासनाकडून अनुदान वितरणाची प्रक्रिया गतीमान करणे, तसेच आवश्यक असल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे.

महासंघाचे सरचिटणीस कॉम्रेड उदय भट यांनी राज्यातील सर्व महानगरपालिका कामगार संघटनांना या बैठकीसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. प्रत्येक संघटनेने किमान पाच प्रतिनिधींसह उपस्थित राहून आपल्या महानगरपालिकेतील वेतन, पेन्शन व इतर थकबाकींचा तपशील लेखी स्वरूपात सादर करावा, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर, बाबासाहेब मुदगल व सचिव आनंद वायकर यांनी सांगितले की, ही बैठक कामगारांच्या हक्कासाठी अत्यंत महत्त्वाची असून राज्यातील सर्व संघटनांनी एकजुटीने सहभागी होणे गरजेचे आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतन व पेन्शनचा प्रश्न हा केवळ आर्थिक नसून त्यांच्या जगण्याशी संबंधित आहे. त्यामुळे यावर तातडीने निर्णय होणे आवश्यक आहे.

राज्यातील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वाढत्या असंतोषाला आता संघटित दिशा मिळत असून पुण्यातील ही बैठक पुढील आंदोलनाची दिशा ठरवणारी ठरणार आहे.

## बनावट गुन्हे रद्द करण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** राहुरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेले कथित बनावट गुन्हे रद्द करण्यात यावेत, या मागणीसाठी यमुना देवराव भालेराव यांनी श्रीरामपूर येथील पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. शुक्रवार (दि.१ मे) पासून हे उपोषण सुरू असून न्याय मिळेपर्यंत माघार घेणार नसल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

१३ एप्रिल २०२६ रोजी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३६१ नुसार चोरी, विनयभंग व खंडणीसारख्या गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा खोटा व जाणीवपूर्वक अडकविण्याच्या हेतूने दाखल केल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे.प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यासाठी घटनेच्या वेळेची टॉवर लोकेशन, मोबाईल डंप डेटा, संबंधितांचे कॉल डिटेल रेकॉर्ड, मोबाईल लोकेशन पडताळणी तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याची मागणी करण्यात आली आहे.

केवळ आरोपांच्या आधारे गुन्हे दाखल न करता तांत्रिक पुराव्यांची शहानिशा करून न्याय द्यावा, अशी मागणी उपोषणस्थळी करण्यात आली. या आंदोलनाला महिला व नागरिकांचा पाठिंबा मिळत असून प्रशासनाच्या भूमिकेकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## डॉ. सुभाष काकडे ज्यु. कॉलेजचा सलग दहाव्या वर्षी १०० टक्के निकाल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव :** आज जाहीर झालेल्या उच्च माध्यमिक (एचएससी) बोर्ड परीक्षा २०२५-२६ च्या निकालात डॉ. सुभाष काकडे ज्युनिअर कॉलेज, म्हैसगावने उल्लेखनीय यश संपादन करत सलग दहाव्या वर्षी १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी व कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनी मेहनत, जिद्द आणि गुणवत्तेच्या जोरावर हे यश मिळवले आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष बन्सी काकडे यांनी २०१७ मध्ये ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने महाविद्यालयाची स्थापना केली होती. आज हे महाविद्यालय विविध क्षेत्रांसाठी गुणवंत विद्यार्थी घडवत आहे. वाणिज्य शाखेत अपूर्वा लेंभे (८१.८३%), कला शाखेत संकेत आंबेकर (७९.१७%) तर विज्ञान शाखेत साक्षी वाणी (७६.१७%) यांनी प्रथम क्रमांक पटकावला. अनुभवी शिक्षकांचे वैयक्तिक मार्गदर्शन, अद्ययावत प्रयोगशाळा, शिस्तबद्ध वातावरण, प्रशस्त क्रीडांगण तसेच ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी ऑफलाईन उएढ क्रॅश कोर्स ही महाविद्यालयाची वैशिष्ट्ये ठरली आहेत.

## धूत कन्या विद्यालयाच्या निकालाची परंपरा कायम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** हरातील राजाबाई माधवलालजी धूत कन्या कनिष्ठ महाविद्यालयाने निकालाची परंपरा कायम राखत यावर्षी बारावी परीक्षेत विज्ञान शाखेचा १०० टक्के तर कला शाखेचा निकाल ९८.७ टक्के लागला आहे. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थीनींमध्ये विज्ञान शाखेतील सर्वच्या सर्व विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या त्यामध्ये ६ प्रथमश्रेणी मध्ये, २३ द्वितीयश्रेणी तर १ पास श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाल्या. कला शाखेमध्ये ५ विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्या, २२ प्रथम श्रेणी, २२ द्वितीय श्रेणी, २ पास श्रेणी मध्ये उत्तीर्ण झाल्या.

कला शाखेत संध्या अशोक फटांगडे हिन. ८४.५० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, निकीता रविंद्र नजन हिने ८०.६७ टक्के गुण मिळवून दुसरा तर प्राची चंद्रकांत पवार हिने ७९.८३ टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक पटकावला. विज्ञान शाखेत पहिला क्रमांक मोमिन अफसिन नाज शफी अहमद, दुसरा मुर्तजा आयेशा हबीब अबुबाकर, तिसरा क्रमांक शेख आरजू अयाशुद्दीन हिने पटकावला.

या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष मा. खा. राजकुमार धूत, संचालक अक्षयकुमार धूत, शालेय समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार मंत्री, सदस्य तृप्ती मंत्री, प्रवीण सोमाणी, सुकुमार मंत्री, राजेंद्र सरोवर, संतोष भालेराव, प्रा. संजीवनी बेंद्रे, पर्यवेक्षिका विदुला शास्त्री यांनी यशस्वी विद्यार्थीनी व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# टाकळीभान ते गुजरवाडी रस्ता व हायमास्ट पथदिव्याचे लोकार्पण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**टाकळीभान :** रमहाराष्ट्र राज्याचे जलसंधारण मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या विकास निधीतून व बाजार समिती व पंचायत समितीचे माजी. सभापती नानासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व टाकळीभान ग्रा. पं. उपसरपंच कान्हा खंडागळे यांच्या विशेष प्रयत्नातून टाकळीभान ते जुना गुजरवाडी रस्त्याच्या खडीकरण व मजबुतीकरणाचा शुभारंभ व

छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढपुतळ्या शेजारी हायमास्ट दिव्याचे लोकार्पण माजी सभापती नानासाहेब पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना नानासाहेब पवार म्हणाले की, ना. राधाकृष्ण विखे यांच्या निधीतून टाकळीभानला भरघोस असा निधी मिळाला आहे तसेच लवकरच घरकुल जागेचा प्रश्नही मार्गी लागणार आहे. येथील सर्व ओढ्याचे रुंदीकरणासाठी लवकरच निधी प्राप्त होणार असून टाकळीभान टेलटँकचे गेटचे बांधकाम, टेलटँक मध्ये पाणी जाणाऱ्या चारीचे खोलीकरण होणार असल्याने टाकळीभान टेलटँक जलद भरला जाईल. या सर्व कामांचा शुभारंभ लवकरच ना राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याचे पवार यांनी सांगितले.

यावेळी शिवाजीराव धुमाळ, उपसरपंच कान्हा खंडागळे, टाकळीभान सोसायटीचे माजी चेअरमन राहूल पटारे, सोसायटीचे व्हा. चेअरमन अविनाश लोखंडे, सुधीर मगर, अनिल दाभाडे, बंडोपंत हापसे, नानासाहेब लेलकर, भाऊ कोकणे, हुळहुळे, बाळासाहेब शेळके, शंकरराव पवार, आप्पासाहेब रणनवरे, अशोक रणनवरे, सुदाम देवळालकर गुरू आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## 'नाथजलचे थंडगार पाणी १५ रुपयांलाच मिळाले पाहिजे !' - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

### लोणावळा बसस्थानकाची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची पाहणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पुणे :** उन्हाळ्यात बसस्थानकावर येणाऱ्या प्रवाशांना 'नाथजल'चे थंडगार पाणी केवळ १५ रुपयांना मिळाले पाहिजे. किंमत वाढवून विक्री करताना आढळल्यास संबंधितांचा विक्री परवाना रद्द केला जाईल, असा इशारा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला. परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज सकाळी पुणे विभागातील लोणावळा बसस्थानकास भेट देऊन तेथील प्रवासी सेवा-सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रवाशांशी संवाद साधला असता, बसस्थानकावर विक्री होत असलेली 'नाथजल'ची एक लिटरची थंड पाण्याची बाटली २० रुपयांच्या वाढीव दराने विकली जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यावर त्यांनी संबंधित विक्रेत्यास स्पष्ट दरफलक लावण्याच्या सूचना देत, पुढे १५ रुपयांची बाटली अधिक दराने विक्री केल्यास विक्री परवाना रद्द केला जाईल, असा इशारा दिला. तसेच, लोणावळा बसस्थानकावर येणाऱ्या काही बसफेऱ्या बसस्थानकात न येता पुढे जात असल्याची तसेच काही बसेस जाणीवपूर्वक खाजगी हॉटेलांवर थांबत असल्याची तक्रार प्रवाशांनी यावेळी मांडली. या हॉटेलांवरील महागडे खाद्यपदार्थ प्रवाशांना परवडत नसल्यामुळे, वेळापत्रकातील सर्व बसफेऱ्या नाश्त्यासाठी लोणावळा बसस्थानकावरच थांबाव्यात, अशी मागणी प्रवाशांनी केली. त्यानुसार, कोणतीही बस खाजगी हॉटेलांवर न थांबता नियोजित वेळापत्रकानुसार लोणावळा बसस्थानकावरच थांबावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी एसटी प्रशासनाला दिले. या पाहणीदरम्यान त्यांनी बसस्थानकातील स्वच्छता, प्रवाशांसाठी उपलब्ध सुविधा, तिकीट व्यवस्था तसेच इतर मूलभूत सोयींचा सविस्तर आढावा घेतला. प्रवाशांना अधिक दर्जेदार व सुलभ सेवा मिळावी यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी त्यांनी बसस्थानकातील कर्मचाऱ्यांशी तसेच प्रवाशांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. प्रवासी सेवेत अधिक पारदर्शकता आणि कार्यक्षमता आणण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

## विवाहितेची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुक्यातील दहेगाव बंगला येथे विवाहित महिलेने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि. १) पहाटे उघडकीस आली. नम्रता आत्माराम बोरुडे (वय २१, रा. दत्त मंदिराजवळ, दहेगाव बंगला ता. गंगापूर) असे मृत महिलेचे नाव आहे. वाळूज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवचरण पांढरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी पहाटे २:१२ वाजता डायल ११२ वर एका महिलेने विहिरीत उडी मारल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच पोलीस अंमलदार सोनवणे व दरोडा पेट्रोलिंगचे सहाय्यक फौजदार उत्तम शिंदे तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.घटनास्थळी रामेश्वर बोरुडे, सोमीनाथ बोरुडे, गणेश बोरुडे, सतीश पंडित आदी नागरिकांनी पोलिसांना खदानीजवळील विहिरीकडे नेले. तेथे एका महिलेचा मृतदेह विहिरीत तरंगताना दिसून आला. विहिरीच्या कडेला मोबाईल, दुपट्टा व चप्पल आढळून आली. उपस्थितांनी सदर महिला नम्रता बोरुडे असून ती रामेश्वर बोरुडे यांची सून असल्याचे सांगितले.

पोलिसांनी कांचनवाडी येथील अग्निशामक दलाला पाचारण करून महिलेचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढला. खाजगी रुग्णवाहिकेतून तिला घाटी रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तिला मृत घोषित केले.

मृत नम्रता हिचा विवाह आत्माराम रामेश्वर बोरुडे यांच्याशी १५ एप्रिल २०२२ रोजी झाला होता. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही. शुक्रवारी सायंकाळी पाच वाजता दहेगाव बंगला येथे पोलिस बंदोबस्तात अंत्यसंस्कार करण्यात आले.

या प्रकरणी वाळूज पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अजय शितोळे करीत आहेत.

## निधन वार्ता

### सौ. इंदुबाई गाढे



**टाकळीभान :** श्रीरामपूर तालूक्यातील टाकळीभान येथील सौ. इंदूबाई सटवाजी गाढे (वय ६३ वर्ष) यांचे नुकतेच निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सूना, नातवंडे असा परिवार आहे. सटवाजी गाढे यांच्या त्या पत्नी होत.

### सरस्वती जंगले



**रपानेगांव :** येथील सरस्वती मारुती जंगले यांचे वृद्धापकाळाने निधन झाले (वय ९३) त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना जावई नातवंडे असा त्यांचा परिवार आहे. प्रगतीशील बाळासाहेब जंगले व पानेगांव ग्रामपंचायत सदस्य रमेश जंगले यांच्या मातोश्री होत.

### गयाबाई जंगले



**पानेगांव :** येथील गयाबाई शिवराम जंगले यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. (वय १००) त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी,सुना, जावई, नातवंडे असा त्यांचा परिवार आहे. मुळाथडी पाणी आरक्षण कृती समितीचे सदस्य राजेंद्र जंगले यांच्या मातोश्री व पशुसेवक डॉ. सुरज जंगले यांचा आजी होत.

### मनीषा निकाळे



**श्रीरामपूर :** येथील मनीषा राजू निकाळे वय(४५) यांचे शनिवार दि.२५ एप्रिल रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले त्यांच्या पश्चात पती, दोन मुले असा मोठा परिवार आहे. श्रीरामपूर तहसील कार्यालयातील राजू निकाळे यांच्या त्या पत्नी होत.

## सर्व नागरिकांनी स्वगणना करून घ्यावी : नगराध्यक्ष संजय जाधव

**गंगापूर :** भारत सरकारच्या आगामी जनगणनेच्या पार्श्वभूमीवर गंगापूर नगरपरिषदेच्या वतीने नागरिकांसाठी 'स्वगणना' ही सुविधा सुरू करण्यात आली असून गंगापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष संजय विठ्ठलराव जाधव यांच्या हस्ते तसेच मुख्याधिकारी संतोष आगळे आदींच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.यंदाची जनगणना ही पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होत असून नागरिकांना स्वतः ची माहिती स्वतः भरण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## मोकळ्या कांदा लिलावास विलंब; शेतकऱ्यांची कांदा साठवणुकीची धडपड

**माळवाडगाव :** अवकाळी पावसाच्या फेऱ्यातून बाहेर पडलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांसमोर आता बाजारपेठेचे संकट उभे ठाकले आहे. श्रीरामपूर बाजार समितीकडून मोकळ्या कांदा लिलावास होणाऱ्या विलंबामुळे शेतकऱ्यांना तीव्र उष्णतेत कांद्याची उचलटाक व साठवणूक करण्याची वेळ आली आहे. गावोगावच्या शिवारात लग्नसराईच्या धांदलीतही शेतकरी शेडमधील कांदा सांभाळताना दिसत आहेत. दुसरीकडे श्रीरामपूर बाजार समितीतील गोणी कांदा मार्केटला ना व्यापाऱ्यांचा प्रतिसाद, ना शेतकऱ्यांची उत्सुकता असल्याने व्यवहार संथ गतीने सुरू आहेत. टाकळीभान येथे मोकळा कांदा मार्केट सुरू करण्याचा निर्णयही लांबणीवर पडल्याची नाराजी व्यक्त होत आहे. काही शेतकऱ्यांनी हवेशीर व मजबूत शेड उभारून कांदा साठवला आहे. काहींनी तात्पुरत्या चाळी, जाळी अथवा शेडमध्ये कांदा ठेवला आहे. मात्र लहान शेतकऱ्यांना साठवणूक शक्य नसल्याने त्यांना तातडीने विक्रीची गरज आहे. सध्या बाजारात मागणी नसल्याने जागेवर सहा-सात रुपये दरानेही व्यापारी कांदा घेत नसल्याची स्थिती आहे.मागील वर्षाच्या तुलनेत यंदा कांदा बाजार सुरळीत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. शेतकरी व व्यापारी यांच्यातील दुवा असलेल्या बाजार समितीने तातडीने मोकळ्या कांदा लिलावास सुरुवात करावी, अशी मागणी होत आहे.



# जगदंबा देवी यात्रा उत्सवात भक्तीचा जल्लोष



**सोनई :** सोनई येथील ग्रामदैवत जगदंबा देवीच्या यात्रा उत्सवात सुरुवात झाली यामुळे गावात धार्मिक व सांस्कृतिक वातावरणाची उत्साहपूर्ण रंगत पाहायला मिळत आहे. या उत्सवात विविध धार्मिक विधी, महाआरती आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यात्रेच्या प्रारंभी जगदंबा मातेस विधीवत जलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर माजी मंत्री शंकरराव गडाख व अर्थ व पशुसंवर्धन समितीचे माजी सभापती सुनीलभाऊ गडाख यांच्या हस्ते भाविकांच्या उपस्थितीत महाआरती पार पडली. यावेळी मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री शंकरराव गडाख म्हणाले की, सोनईची जगदंबा देवी यात्रा ही अनेक वर्षांची समृद्ध परंपरा आहे. याप्रसंगी अर्थ व पशुसंवर्धन समितीचे माजी सभापती सुनीलभाऊ गडाख, माजी सरपंच हरिभाऊ दरंदले, भाऊसाहेब निमसे, बाळासाहेब बनकर, बाबा अनारसे, राजेंद्र बोरुडे, प्रकाश शेटे, उदय पालवे, डॉ. माऊली दरंदले, उपसरपंच प्रसाद हारकळे, आप्पासाहेब निमसे, कल्याण गडाख, वसंतराव कुसळकर, मच्छिंद्र कुसळकर, सचिन गर्जे आदी मान्यवरांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यात्रा उत्सवामुळे सोनई गावात भक्ती, परंपरा आणि एकोपा यांचा संगम अनुभवायला मिळत असून, गावाच्या सांस्कृतिक वारशाचे जतन करण्यात या उत्सवाची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे चित्र दिसून आले.


## नशिबाची परिक्षा

**रविवार दि .०३ मे २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१२० ६७० ५८० — ३-४ — १२० २२८ २००

जोड ३०-६०-१७-९२-४५

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१०५ १३८ ६०८ — ६-१ — १२८ २९० २०९

जोड ६२-९१-४५-०८-४५

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

४८० ५७० ६६० — २-९ — १२६ १८० ११७

जोड २१-०९-३५-६७-९४

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *


## शिर्डीत वीजेचा बट्ट्याबोळ,तिव्र अंदोलन छेडण्याचा ग्रामस्थांचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या शिर्डी शहरात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक, व्यावसायिक आणि भाविक अक्षरशः हैराण झाले असून महावितरणच्या निष्क्रिय व बेफिकीर कारभाराविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे. सततच्या वीज खंडितीमुळे हॉटेल, लॉजिंग, दुकाने व इतर व्यवसायांना मोठा आर्थिक फटका बसत असून शहराचे जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले आहे.

लॉकडाऊन पूर्वी कोपरगाव येथून ३३ केव्ही सप्लाय बंद झाला तर त्वरित पर्यायी मार्ग म्हणून बाभळाशेवर वरून ३३ के व्ही फीडिंग सप्लाय ची लाईन चालू होती परंतु सध्या महावितरणच्या बेशिस्त कारभारामुळे शिर्डी करांना व्यावसायिकांना याचा मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.

शिर्डी हे देश-विदेशातील लाखो साईभक्तांचे श्रद्धास्थान असताना येथे अखंड व दर्जेदार वीजपुरवठा राखण्यात महावितरण अपयशी ठरत असल्याची टीका होत आहे. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर वारंवार होणारी वीज खंडिती नागरिकांसाठी असह्य ठरत असून भाविकांचीही मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. यामुळे शिर्डीच्या प्रतिमेलाही धक्का बसत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

डिजिटल मीटर मुळे हॉटेल व व्यावसायिक व घरगुती ग्राहकांना वीज बिल अव्वाच्या सव्वा देऊन ग्राहकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक हानी होत असून मनमानी कारभारामुळे आमच्या वर लादलेले मीटर ऑटो डिस्कॉननेट होत आहे याचा त्वरितबंदोबस्त महावितरणाने करावा.

राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे आणि भाजपा प्रदेश उपाध्मक्ष डॉ. सुजय विखे यांच्या प्रयत्नांतून शिर्डी शहर झपाट्याने विकासाच्या दिशेने वाटचाल करत असताना महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे या विकासाला गालबोट लागत असल्याची जोरदार टीका कैलासबापू कोते आणि गोपीनाथ बापू गोंदकर यांनी केली आहे.

**उपअभियंता पाटील निष्क्रिय**

राहाता महावितरण चे उप अभियंता डी डी पाटील यांच्या कार्यकाळात विजेचा बट्ट्याबोळ झाला असून कर्मचाऱ्यांवर त्यांचा वचक राहीला नसल्याने कर्मचारी मनमानी करत आहेत त्यांचे कार्यक्षेत्रात असणाऱ्या ग्राहकांच्या तक्रारी व समस्या सोडवण्यात अपयशी ठरत असल्याने तालुक्यातून महावितरणच्या विरोधात प्रचंड असंतोषाची लाट निर्माण झाली आहे.

**शिर्डीकरांचा संयम पाहू नका : कोते, गोंदकर**

शिर्डीकरांचा संयम आता संपत चालला आहे. वारंवार होणाऱ्या वीज खंडितचा हा प्रकार तात्काळ बंद झाला पाहिजे. अन्यथा महावितरणच्या कार्यालयावर धडक मोर्चा काढून तीव्र आंदोलन छेडले जाईल. नागरिकांना मूलभूत सुविधा देण्यात येथील अधिकारी सातत्याने अपयशी ठरत असून त्यांना जाब विचारला जाईल. पूर्वसूचना न देता वीज खंडित करण्याचा प्रकार यापुढे खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा शिर्डीचे प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते व माजी उपनगराध्यक्ष गोपीनाथ गोंदकर यांनी दिला आहे.

द·ख·ल




## समता बंधुत्व आणि एकता हीच मढेवडगावची ओळख

**लिंपणगाव** : मढेवडगावचे लोकनियुक्त सरपंच प्रमोद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मढेवडगावची ओळखच समतेची, बंधुत्वाची आणि एकतेची आणि आज त्याच भूमीत तिहेरी आनंदाचा सोहळा उजळून निघाला! समतेची भूमी ठरलेल्या मढेवडगावमध्ये बुद्ध पौर्णिमा, महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन हे तिन्ही दिवस एकाच वेळी अत्यंत उत्साहात आणि अभिमानाने साजरे करण्यात आले. बुद्धांच्या करुणा, शांती आणि समतेच्या विचारांची प्रेरणा, महाराष्ट्राच्या स्थापनेचा अभिमान आणि कष्टकरी कामगारांच्या योगदानाबद्दलची कृतज्ञता या तिन्ही भावनांचा संगम आज मढेवडगावमध्ये पाहायला मिळाला. गावकऱ्यांनी एकत्र येत सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि प्रगतीचा संदेश देत कामगार दिनाचे औचित्य साधून मंडळ गावचे कर्तव्यदक्ष कर्मचारी श्री माऊली साळवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून हा दिवस अधिक अर्थपूर्ण केला. अशा उपक्रमांमुळेच मढेवडगावची ओळख एक आदर्श, प्रगत आणि समतेची वाट चालणारे गाव म्हणून अधिक भक्कम होत आहे.

## शब्दगंध संमेलनाची बैठक संपन्न

**अहिल्यानगर** : शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या आगामी राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित महत्त्वपूर्ण बैठकीत संमेलन अधिक व्यापक, सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. नवोदित कवी-लेखकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी यंदाच्या संमेलनात गझल संमेलन व दोन स्वतंत्र काव्यसत्रांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती कार्याध्यक्ष तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे यांनी दिली. मान्यवर आणि नवोदित यांचा सुरेख मेळ घालून संमेलन यशस्वी करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

अध्यक्ष राजेंद्र उदागे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीला संस्थापक सचिव सुनील गोसावी, माजी प्राचार्य डॉ.जी.पी.ढाकणे, राज्य संघटक प्रा. डॉ. अशोक कानडे, खजिनदार भगवान राऊत तसेच राज्य कार्यकारिणी सदस्य राजेंद्र चोभे, नवजीवन संस्थेचे राजेंद्र पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत संमेलनाच्या विविध अंगांवर सविस्तर चर्चा करून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. बैठकीत मकरंद घोडके, बबनराव गिरी, शर्मिला गोसावी, प्रा. डॉ. अनिल गर्जे, सुरेखा आडम, विनय पिंपरकर, अर्चना तुपे, उमादेवी राऊत, वर्षा घुले, हर्षल आगळे, सुरेखा घोलप, संदीप गोसावी, प्रा. डॉ. तुकाराम गोंदकर, स्वाती अहिरे, प्रशांत सूर्यवंशी, हौशीनाथ बोर्डे, हर्षली गिरी, गोविंद आडम आदी उपस्थित होते. त्यांनी विविध विषयांवर आपापले मत मांडत संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी आवश्यक सूचना केल्या.

बैठकीच्या प्रारंभी सुनील गोसावी यांनी प्रास्ताविक केले. भगवान राऊत यांनी उपस्थितांचे स्वागत केले. शेवटी प्रा. डॉ. अशोक कानडे यांनी आभार मानले.

## छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे यशाची उज्वल परंपरा कायम

**लिंपणगाव** : कष्टाला जिद्दीची जोड मिळाली की यश निश्चित मिळते', याचा प्रत्यय पुन्हा एकदा श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाने दिला आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या परीक्षेच्या निकालात महाविद्यालयाने आपली उच्च निकालाची परंपरा कायम राखत शैक्षणिक क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला आहे. विशेषतः विज्ञान शाखेने ९८.०३% निकाल लावून यशाचे शिखर गाठले आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध शाखांमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. यात मुलींनी बाजी मारल्याचे पाहायला मिळत आहे:

विज्ञान शाखा: मानसी विलास ढवळे हिने ९२.५० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. (विज्ञान शाखा एकूण निकाल: ९८.०३%)

वाणिज्य शाखा: वैष्णवी अशोक गावडे हिने ९०.५० टक्के गुण मिळवून कठोर परिश्रमाच्या जोरावर प्रथम येण्याचा बहुमान मिळवला.

## वांबोरीत सोमवारपासून शिव महापुराण कथा!

**अहिल्यानगर** : राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे श्रीवृद्धेश्वर सेवा मंडळ आयोजित शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि.४ मे ते रविवार दि. १० मेपर्यंत ही कथा होणार आहे. वांबोरी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात कथा होणार आहे. राष्ट्रीय कथाकार हभप समाधान महाराज शर्मा, केज यांच्या सुश्राव्य वाणीतून ही कथा साकारली जाणार आहे. सायंकाळी साडेसहा ते साडेनऊ या कालावधीत ही कथा होईल. या कथेसाठी हभप संतोष महाराज शर्मा यांचे संगीत लाभले आहे. सोमवारी सायंकाळी पाच वाजता गावातील श्रीविठ्ठल मंदिरापासून ग्रंथ मिरवणूक निघणार आहे. डोंगरगणचे हभप जंगले महाराज शास्त्री व अहिल्यानगरचे हभप नीलेश महाराज कमळापूरकर तसेच ब्रह्मकुमारीज् पुणे मिरा सोसायटीच्या संचालिका राजयोगिनी ब्रह्मकुमारी नलिनी दीदीची यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात येणार आहे.

# शेवगावमध्ये बॉम्बे मशिनरीच्या गोडाऊनला आग

## सुमारे २५ लाखांचे नुकसान : सुदैवाने जीवितहानी टळली

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अमरापूर** : शेवगाव शहरातील नेवासा रोडवरील बॉम्बे मशिनरी यांच्या गोडाऊनला पहाटे सहा ते साडेसहा वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. ही आग इतकी भयानक होती की क्षणार्धात तिने रौद्ररूप धारण केले. या घटनेत बॉम्बे मशिनरी गोडाऊन मधील पीव्हीसी पाईप जळून सुमारे २० ते २५ लाखाचे नुकसान झाले. मात्र सुदैवाने या घटनेत जीवित हानी टळली आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनास्थळी आजूबाजूला हॉस्पिटल तसेच काही दुकाने असल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

गोडाऊनचे संचालक सुधीरशेठ यांनी दिलेल्या माहितीनुसार, या आगीच्या घटनेमध्ये पीव्हीसी पाईप तसेच एचडीपीई पाईपचा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अंदाजे २० ते २५ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. आगीची तीव्रता लक्षात घेता तात्काळ विविध ठिकाणांहून अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले.

वृद्धेश्वर कारखाना, पाथर्डी नगरपरिषद, ज्ञानेश्वर कारखाना (भेंडा), गंगामाई कारखाना आदी ठिकाणांहून अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे काही तासांत आग आटोक्यात आणण्यात यश आले.

या वेळी एमसीबीचे वायरमन नसीर काझी व बापू कळसाई यांनी विशेष सहकार्य करत तब्बल ९ पंपांच्या साहाय्याने आग विझविण्यात मोलाची भूमिका बजावली.

दरम्यान, पाथर्डी नगरपरिषदेचे नारळकर यांनीही घटनास्थळी भेट दिली. या सर्व अग्निशमन दलांचे वेळेवर आगमन झाल्याने बॉम्बे मशिनरीचे संचालक सुधीर शेठ सबलोक यांनी आभार मानले.

मात्र शेवगाव नगरपरिषदेचा स्वतःचा अग्निशमन बंब उपलब्ध असता, तर आग अधिक लवकर आटोक्यात आली असती, अशी खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे.




## एनएमएमएस परीक्षेत क्षितिज गावडे व सार्थक राहिंज शिष्यवृत्तीधारक



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नेहमीच विविध उपक्रम राबविण्यात आघाडीवर असते. चालू वर्षी शासनाकडून घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना परीक्षेत विद्यालयातील इयत्ता आठवी वर्गातील गावडे क्षितिज कमलेश आणि राहिंज सार्थक सतीश हे दोन विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. या विद्यार्थ्यांना प्रत्येकी प्रतिवर्षी बारा हजार रुपये प्रमाणे चार वर्षाचे अठ्ठेचाळीस हजार शिष्यवृत्ती मिळणार आहे.दोघांना एकत्रित शहयान्नव हजार शिष्यवृत्ती मिळणार आहे. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक पंडीत घोंगडे ,पर्यवेक्षक शिवप्रसाद मेहेत्रे यांनी अभिनंदन केले आहे. या विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेसाठी विभागप्रमुख श्री दीपक कुलांगे,श्री मिनीनाथ मोरे,श्रीमती अश्विनी निकम ,श्रीमती अनिता साबळे, श्रीमती अर्चना कोरडे तसेच सर्वच शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यालयाच्या या यशाबद्दल माजी मंत्री बबनरावजी पाचपुते यांनी कौतुक केले आहे. तसेच उत्तर विभागाचे विभागीय अधिकारी श्री नवनाथ बोडखे,स्थानिक स्कूल कमिटी सदस्य श्री अरुणराव पाचपुते, श्री भगवानराव पाचपुते, श्री बाळासाहेब राहिंज,सरपंच श्री. साजन भैय्या पाचपुते सेवा संस्थेचे चेअरमन श्री राकेशभाऊ पाचपुते तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रेम राहींज सर्व पालक विद्यार्थी आदींनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## निर्मलाताई काकडे महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : येथील निर्मलाताई काकडे आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये १ मे हा 'महाराष्ट्र दिन' आणि 'आंतरराष्ट्रीय कामगार दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या ध्वजारोहण समारंभाने परिसर देशप्रेम आणि मराठी अस्मितेच्या घोषणांनी दुमदुमून गेला होता.

ध्वजारोहण आणि मानवंदना

कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग दुकळे यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. यावेळी राष्ट्रगीत आणि राज्यगीत 'जय जय महाराष्ट्र माझा' उत्साहात गायले गेले.

तिरंग्याला मानवंदना देताना उपस्थित विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी महाराष्ट्र निर्मितीसाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांचे स्मरण केले.

या सोहळ्याला प्राचार्य डॉ. भगवान बारस्कर, सर्व विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या भाषणात प्राचार्य डॉ. पांडुरंग दुकळे यांनी महाराष्ट्र राज्याच्या गौरवशाली इतिहासावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की,

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून आकाराला आलेला आपला महाराष्ट्र आज शिक्षण, उद्योग आणि संस्कृती या सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहे. तरुणांनी या राज्याच्या प्रगतीत आपले योगदान द्यावे तसेच, १ मे हा कामगार दिन असल्याने त्यांनी महाविद्यालयाच्या विकासात मोलाचा वाटा उचलणाऱ्या सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कष्टाचाही गौरव केला.



## भातकुडगांव हायस्कूल येथे महाराष्ट्र दिन साजरा

**ढोरजळगांव** : भातकुडगाव माध्य व उच्च माध्य विद्यालयात १ मे निमित्त ६७ वा महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक दत्तात्रय पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी प्राचार्य सुरेश शेरे उपस्थित होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष सुनील वाकडे बोलताना म्हणाले की संयुक्त महाराष्ट्रासाठी अनेकांनी संघर्ष केला, त्याग केला, त्यातूनच आजचा महाराष्ट्र घडला आहे. तसेच कामगार दिनाच्या निमित्ताने सर्व कामगारांच्या कष्टांचा सन्मान करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील करंडे यांनी केले आभार नवनाथ पवार यांनी मानले.

## न्यू इंग्लिश स्कूल १९८८ बॅचचा स्नेह मेळावा उत्साहात

**अहिल्यानगर** : वाळकी (ता. नगर) येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या इयत्ता १० वी (एस.एस.सी.) १९८८ बॅचचा स्नेह मेळावा महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या निमित्ताने शहरात उत्साहात पार पडला. तब्बल ३६ वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत जुन्या मैत्रीचा आनंद लुटला. या विशेष प्रसंगी सामाजिक बांधिलकी जपत कामगार दिनानिमित्त हॉटेलमधील सर्व कामगारांचा सत्कार करून त्यांना सन्मानित करण्यात आले. हा उपक्रम कामगारांच्या मनाला भावला. कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग, उद्योजक रामराव मुनफन, सेवानिवृत्त मेजर रविंद्र नाईक, शिरीष गायकवाड, अरुण कुंजीर, रामदास इंगळे, दामोधर भालसिंग, वसंत कासार, राजेंद्र निमसे, हरिचंद्र माने, विनायक इंगळे, पोपट बाचकर, दादा पडवळकर, सुरेश जासुद, संगिता मते आदी मान्यवर उपस्थित होते.

### दत्त मंदिर संस्थेचा आध्यात्मिक-सामाजिक कार्य

## गौरव सोहळा उत्साहात



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : अहंकार विरहित व निस्वार्थ भावनेने कोणत्याही संस्थेचे कार्य केले, तर त्या संस्थेची प्रगती निश्चित होते. परमपूज्य दादाजी वैशंपायन यांच्या सानिध्याने सुरू असलेले दत्त मंदिर संस्था व गुरुदत्त सामाजिक, सांस्कृतिक, कला व क्रीडा संस्थेचे कार्य तालुक्यासाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन गुरुवर्य हरिभक्त परायण राम महाराज झिंजुर्के यांनी केले.

शेवगाव येथे गुरुदत्त सामाजिक, सांस्कृतिक, कला व क्रीडा संस्थेच्या वतीने आयोजित आध्यात्मिक व सामाजिक कार्य गौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी जगदंबा ट्रस्ट, देऊळगाव राजा चे संस्थापक परमपूज्य प्रा. मुकुंदनाथ आंधळे महाराज यांनीही संस्थेच्या कार्याचे कौतुक करताना, परमपूज्य दादाजी वैशंपायन यांच्या आशीर्वादाच्या लहरी आजही या परिसरात जाणवतात. समाजात आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्यांचा गौरव करून संस्था त्यांना नवे बळ देते, असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन माजी प्राचार्य दिलीप फलके यांनी केले. आभार प्रदर्शन निवृत्ती गोरे यांनी मानले.

या प्रसंगी नगराध्यक्षा मायाताई मुंढे, अरुण मुंढे, पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, नंदकुमार शेळके, डॉ. महेंद्र गौशाल, रवींद्र पुसाळकर, उपअभियंता प्रल्हाद पाठक, संजय फडके, आरती पवार, डॉ. संजय लाड, डॉ. बाळासाहेब मुरदारे यांच्यासह बन्सी पांगरे, जनार्दन हारके, पी. बी. शिंदे, किसनराव माने, लक्ष्मण काळे, बंडू भोर, अभय पालवे, प्राचार्य कुलकर्णी, सुरेश घुले आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षकांचे कार्य गावाला दिशा देणारे : डॉ.काकडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगाव** : जगात सर्वात सुंदर आणि उत्कृष्ट पेशा म्हणून शिक्षकी पेशाकडे पाहिले जाते. पूर्वी शिक्षक केवळ शाळाच नव्हे, तर 'गावकी' सुद्धा करायचे आणि अश्या शिक्षकांचा एक सामाजिक दबदबा कायम असायचा असे निष्ठावान शिक्षक हाच कोणत्याही संस्थेचा खरा गौरव असतो.शिक्षकांचा सन्मान हा देशाचा सन्मान असुन राम काटे सरांनी त्यांच्या संपूर्ण सेवा काळात कायम हसतमुख राहून आणि विद्यार्थ्यांवर जीवापाड प्रेम करून आदर्श शिक्षकाची भूमिका पार पाडली आहे शिक्षकांचे कार्य गावासाठी दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ड.डॉ.विद्याधर काकडे यांनी बोलताना व्यक्त केले.

ढोरजळगांव ता. शेवगांव येथील श्रीराम विद्यालयाचे क्रीडा शिक्षक राम काटे आपल्या ३२ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.त्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळ्यानिमित्त ड डॉ विद्याधर काकडे बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे औचित्त साधून विद्यालयात ढोरजळगाव



ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून शुद्ध पाण्याचे आर.ओ वॉटर फिल्टरचे उदघाटन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले तसेच विद्यालयातील एन.एम.एम.एस परीक्षेत शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थिनी कु.गिरीजा देविदास देशमुख व साई अनंत आंबुर्डे या दोघांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमासाठी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ लक्ष्मण बिटाळ,शिक्षण विभागाचे सहप्रमुख अशोक आहेर , डॉ.सुधाकर लांडे, देविदास गिऱ्हे, देविदास पाटेकर, विक्रम उकिर्डे,भाऊसाहेब अकोलकर, सूर्यभान गाडगे, डॉ.देविदास देशमुख, भाऊसाहेब सातपुते,लक्ष्मण गवळी, अनंता उकिर्डे, गणेश कराड,रामेश्वर केसभट, शेषेराव गिऱ्हे,किरण हंबर कल्याण जायभाये, सखाराम घावटे, संस्थेच्या विविध शाखेतील प्राचार्य व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह ग्रामस्थ,पालक,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य संजय चेमटे यांनी केले तर सूत्रसंचालन ईश्वर वाबळे यांनी केले विद्यालयाच्या पर्यवेक्षिका श्रीम. सुरेखा शेलार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पाथर्डीत खड्डयांत उतरून गांधीगिरी आंदोलन

## खड्डे तात्काळ बुजवा अन्यथा उग्र आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी** : पाथर्डी शहरातील राष्ट्रीय महामार्गाची बिकट अवस्था आता संतापाचा ज्वालामुखी ठरू लागली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेल्या जीवघेण्या खड्ड्यांमुळे नागरिक आणि प्रवाशांचे हाल होत असताना प्रशासन मात्र उदासीन आहे. याच पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार प्रशांत सोनवणे पाटील यांनी गांधीगिरीचा अनोखा मार्ग अवलंबत थेट खड्ड्यात उतरून आंदोलन छेडले.

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने नाईक चौकात झालेल्या या आंदोलनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. गळती होणाऱ्या पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बसून आंघोळ करत त्यांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध नोंदवला.

कल्याण-विशाखापट्टण राष्ट्रीय महामार्गाची दुर्दशा मेहेकरीपासूनच सुरू होत असल्याचे त्यांनी सांगितले. टोल नाक्याच्या वादामुळे तयार करण्यात आलेल्या डायव्हर्शन रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः छोट्या वाहनांचे नुकसान वारंवार होत असल्याने नागरिकांमध्ये संताप वाढत आहे.



पाथर्डी शहरातील नाईक चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक आणि जुन्या बसस्थानक परिसरात परिस्थिती अत्यंत गंभीर झाली आहे. जायकवाडी योजनेच्या पाईपलाईनमधील गळतीमुळे रस्त्यांवर मोठे खड्डे तयार झाले असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. खड्डे चुकवताना वाहने चुकीच्या बाजूने वळवावी लागत असल्याने अपघात आणि वाहतूक कोंडी ही रोजचीच बाब झाली आहे.

दरम्यान, रस्त्यालगतच्या गटारींचे निकृष्ट दर्जाचे कामही उघड झाले आहे. नव्याने केलेल्या गटारी काही दिवसांतच फुटत असल्याने प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. परिवहन महामंडळाकडून वारंवार पाठपुरावा करूनही केवळ आश्वासनांपलीकडे काहीच होत नसल्याची खंत व्यक्त होत आहे.

वाहतुकीचा वाढता ताणही या समस्येत भर घालत आहे. पुणे-मुंबईकडे जाणाऱ्या मराठवाड्यातील मोठ्या प्रमाणातील वाहतूक सध्या पाथर्डी मार्गे होत असल्याने शहरातील रस्त्यांवर दिवसभर आणि रात्री उशिरापर्यंत प्रचंड गर्दी असते. त्यातच अनधिकृत पार्किंग, अतिक्रमण आणि अवैध प्रवासी वाहतूक यामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे.

या सर्व प्रकारांमुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. वारंवार तक्रारी करूनही अधिकारी प्रतिसाद देत नाहीत, तर पालिका आणि महामार्ग विभाग एकमेकांकडे बोट दाखवत जबाबदारी झटकत असल्याचा आरोप करण्यात आला.


या पार्श्वभूमीवर तातडीने खड्डे बुजवून गटारींची दुरुस्ती न झाल्यास कुटुंबीय आणि कार्यकर्त्यांसह अधिक तीव्र आंदोलन उभारले जाईल. असा इशारा प्रशांत सोनवणे यांनी यावेळी दिला. या आंदोलनाला विविध सामाजिक संघटना, व्यावसायिक आणि नागरिकांनी मोठा पाठिंबा दर्शवला आहे .

## द • ख • ल

## आरोपीविरोधात फास्टट्रॅक न्यायालयात खटला चालवणार

**पुणे :**- नसरापूर येथे घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी असून समाजमनाला हादरवणारी आणि माणुसकीला काळीमा फासणारी आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज पुणे येथील धायरी येथे जाऊन पीडित मुलीच्या पालकांची भेट घेतली. यावेळी त्यांनी कुटुंबीयांचे सांत्वन करत त्यांच्याशी संवाद साधला. शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून नराधम आरोपीवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा विश्वास त्यांना दिला. या भेटीदरम्यान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी घटनास्थळावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून संपूर्ण घटनेची माहिती दिली. या प्रकरणात खटला फास्टट्रॅक न्यायालयात चालवून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा मिळावी, अशी मागणी केली. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सदर खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवून आरोपीला मृत्युदंडापर्यंतची शिक्षा होण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल असे सांगितले.दरम्यान, हे अमानुष कृत्य करणारा आरोपी सध्या पोलिसांच्या ताब्यात असून त्याच्याविरोधात सबळ पुराव्यांच्या आधारे दोषारोपपत्र लवकरात लवकर न्यायालयात दाखल करण्याच्या सूचना संबंधित पोलिस अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. सदर प्रकरणाचा खटला फास्टट्रॅक न्यायालयात चालवण्यात येणार असून यासाठी विशेष सरकारी वकील नेमण्यात येणार आहे. तसेच पॉक्सो कायद्यानुसार आरोपीस अत्यंत कठोर शिक्षा मिळावी यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी स्पष्ट केले.अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी संबंधित यंत्रणांना कठोर पावले उचलण्याचे निर्देश देण्यात आले असून, दोषींना कोणतीही सूट दिली जाणार नाही, असा ठाम इशाराही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी दिला.

## श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात 'शहाळे महोत्सव'



**पुणे:** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात आज वैशाख पौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर 'पुष्टीपती विनायक जयंती' (गणेश जन्म) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली . या विशेष दिनाचे औचित्य साधून मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही आकर्षक 'शहाळे महोत्सव' आयोजित करण्यात आला होता. पहाटेपासूनच मंदिरात धार्मिक विधींना सुरुवात झाली. बाप्पाच्या मूर्तीसमोर आणि संपूर्ण सभामंडपात शहाळ्यांची (नारळांची) कलात्मक पद्धतीने मांडणी करण्यात आली आहे. हिरव्यागार शहाळ्यांच्या या सजावटीमुळे गाभारा अतिशय प्रसन्न आणि नयनरम्य दिसत होता. उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेता आणि निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा महोत्सव साजरा केला जातो. दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टच्या वतीने दरवर्षी हा उपक्रम राबवला जातो. पुष्टीपती विनायक जयंतीच्या निमित्ताने बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी पुणेकरांसह राज्यभरातून भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. पहाटेपासूनच मंदिराबाहेर लांब रांगा पाहायला मिळत आहेत. ''बाप्पाचे हे रूप पाहून मन प्रसन्न झाले,'' अशा भावना अनेक भाविकांनी व्यक्त केल्या.

## हजारो भाविकांच्या उपस्थितीत नरसिंह महाराजांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा

**वळती :** श्री तीर्थक्षेत्र रांजणी (ता. आंबेगाव) येथे श्री नरसिंह जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. या सोहळ्यानिमित्त पुणे, नगर, ठाणे आदी जिल्ह्यांतून हजारो भाविकांनी उपस्थिती लावत रांजणी येथील नरसिंह महाराजांचे दर्शन घेतले.रांजणी ग्रामस्थांची नरसिंह देवावर असलेली श्रद्धा आणि निष्ठा यामुळे लोकसहभाग व लोकवर्गणीतून तब्बल ३ कोटी रुपये खर्चून भव्य व आकर्षक मंदिर उभारण्यात आले आहे. जीर्णोद्धारानंतरचा हा पहिलाच जयंती सोहळा असल्याने गावात विशेष उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.गावात गेल्या ४० वर्षांपासून अखंड सुरू असलेली नाट्यपरंपरा याही वर्षी जोपासण्यात आली. समाज विकास नाट्य मंडळ तसेच कलंक नरकेसरी नाट्य मंडळ यांच्या वतीने विविध नाट्यप्रयोग सादर करण्यात आले.जयंतीनिमित्त सात दिवसांच्या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी श्रींचा अभिषेक, श्री नरसिंह भक्त लखोजी महाराज यांच्या पादुकांची ग्रामप्रदक्षिणा, महिलांचा मंगलकलश सोहळा, युवक-युवतींचे लेझीम पथक व ढोलपथकासह भव्य मिरवणूक काढण्यात आली.सायंकाळी ह.भ.प. हर्षद महाराज जोगळेकर (पुणे) यांचे नरसिंह जन्माचे कीर्तन झाले. यावेळी भाविकांनी पुष्पवृष्टी करत नामगजरात सहभागी होत संपूर्ण परिसर भक्तीमय करून टाकला.

तसेच नरसिंह जयंतीनिमित्त तीन दिवसीय (दि. २ ते ३) भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व सोहळ्याचे उत्कृष्ट नियोजन रांजणीतील युवक, देवस्थान ट्रस्ट आणि ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले.



# तरुणाला गाडीत घालून मारहाण :एकास अटक

### मोबाईल आणि १५ हजारांची लूट, जीवे मारण्याच्या धमक्या देत सोडले रस्त्यावर, आरोपी अटकेत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती तालुक्यातील माळेगाव बुद्रुक येथील २३ वर्षीय प्रतिक धंगेकर या तरुणाचे अपहरण करून त्याला बेदम मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून संबंधित आरोपी पिंटू धुमाळ राहणार कोराळ तालुका बारामती या पोलिसांनी अटकही केली आहे.




प्रतिक धंगेकर हा पुण्यात नोकरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. २४ एप्रिल रोजी दुपारी बारामतीतील रिलायन्स मॉल परिसरात असताना आरोपींनी कारमधून येत त्याला जबरदस्तीने गाडीत बसवले. त्यानंतर आरोपी धुमाळ याचे पत्नीला अपशब्द वापरले या कारणावरून त्याचे दोन्ही मोबाईल काढून घेत मारहाण करण्यात आली. तांदुळवाडी रोडवरील एका हॉटेलच्या गोडाऊनजवळ नेऊन आरोपींनी त्याला लाकडी दांडक्यांनी व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी 'पिंटू धुमाळ याच्या पाया पडून माफी माग' असा दबाव टाकत व्हिडिओ शूट करण्याचाही प्रयत्न करण्यात आला. तसेच, आरोपींनी त्याच्या खिशातील १५,३०० रुपये जबरदस्तीने काढून घेतल्याचा आरोप आहे. मारहाणीदरम्यान त्याचे घड्याळही तुटून पडले असून ते आरोपींनी उचलून घेतल्याचे फिर्यादीत नमूद आहे. गंभीर मारहाण करून आरोपींनी त्याला रस्त्यावर सोडून दिले. तसेच, पोलीसात तक्रार दिल्यास जीवे मारण्याची धमकीही दिली. तक्रारदाराची तक्रारीवरून बारामती तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल आहे.

या प्रकरणी पिंटू उर्फ शरद धुमाळ, भारत मोहीते, अक्षय सोनवणे, अधिराज मोरे व इतर अनोळखी व्यक्तींविरोधात अपहरण करून मारहाण करणे आणि जबरीने वस्तू काढून घेण्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एक आरोपी अटक करण्यात आला असून अटक आरोपी पिंटू उर्फ शरद धुमाळ यास दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

पोलीस पुढील तपास पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमोल कदम आणि पोलीस जवान दादा दराडे करत आहेत.

## पुरंदरचा बारावीचा निकाल ९२.०६ टक्के

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारीमध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. पुरंदर तालुक्याने ९३.०६ टक्के निकाल प्राप्त करत अभिनंदनीय यश मिळवले आहे. परीक्षेसाठी एकूण २३५८ विद्यार्थ्यांपैकी २१७१ विद्यार्थी पास झाले असून प्राविण्यमध्ये ९३ प्रथम श्रेणी मधे ३८७ द्वितीय श्रेणीत २२९६ तर ३९५ विद्यार्थी पास झाले आहेत. कला, वाणिज्य व विज्ञान आदी शाखांचा निकाल वेगवेगळा असून यात काही विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांचा शाळा यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

पुरंदरच्या पूर्व भागातील पिसर्वे शाळा विज्ञान शाखेत १०० टक्के.. पुरंदरच्या पूर्व भागात डॉ शंकरराव कोलते विद्यालयाचा कला शाखेचा निकाल ९३.०७ तर विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला आहे. विज्ञान शाखेत समीक्षा महादेव रणपिसे प्रथम क्रमांक ६३.३३ टक्के प्राची लक्षण बडध्ये द्वितीय क्रमांक ५९.१७ टक्के तर अंकिता परशुराम चव्हाण तृतीय क्रमांक ५२.८३ टक्के मार्क्स मिळवून यशस्वी झाले आहेत.कला शाखेत प्रथम संकल्प पांचाळ ७०.३३ टक्के, द्वितीय तनुजा नरसाळे ६५.५० तर तृतीय क्रमांक शिवराज लकडे याने ६४.३३.टक्के मार्क्स प्राप्त केले आहेत. विजयराव कोलते, शांताराम बापू कोलते, सरपंच रविंद्र कोलते, उपसरपंच चंद्रकांत बापू कोलते, स्कूल कमिटीचे सर्व सदस्य, प्राचार्य एन जी गायकवाड, महेश कोलते सर अरुण कोलते. ग्रामस्थ, सर्व शिक्षक वृंद यांसह अनेकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.)

## श्री छत्रपती शाहू हायस्कूलला 'कर्मवीर पारितोषिक' जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती येथील श्री छत्रपती शाहू हायस्कूलला रयत शिक्षण संस्थेचा अत्यंत मानाचा समजला जाणारा 'कर्मवीर पारितोषिक' जाहीर झाला आहे. शैक्षणिक गुणवत्तावाढ, स्पर्धा परीक्षांतील उल्लेखनीय यश तसेच विविध उपक्रमांतील सातत्यपूर्ण कामगिरीच्या आधारे या विद्यालयाची निवड करण्यात आली आहे.



या विद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांचा उल्लेख विशेष अभिमानाने केला जात आहे. त्यांच्या प्रेरणादायी कार्याचा वारसा पुढे नेत विद्यालयाने गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा जपली आहे. स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष सदाशिव बापूजी सातव यांनी सेवकांना वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शनामुळे विद्यालयाच्या प्रगतीला बळ मिळाले आहे. तसेच विद्यालयाचे प्राचार्य श्री गणपत तावरे यांचे नियोजनबद्ध कामकाज, नेतृत्व आणि गुणवत्तावाढीसाठीचे प्रयत्न या पुरस्कारामागे महत्त्वाचे ठरले आहेत.सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल देण्यात येणारा हा सन्मान कर्मवीर अण्णांच्या पुण्यतिथीनिमित्त सातारा येथे होणाऱ्या कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे. या यशाबद्दल विद्यालयाचे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, या सन्मानामुळे विद्यालयाच्या प्रगतीला नवे बळ मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## गायत्री अवधानी यांची 'मानद वन्यजीव रक्षक'पदी नियुक्ती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वळती :** दि. ३० एप्रिल २०२६ रोजी गायत्री नचिकेत अवधानी (राजगुरव) यांची महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वनविभागामार्फत पुणे जिल्ह्याच्या मानद वन्यजीव रक्षक या पदावर नियुक्ती करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले आहे. ही नियुक्ती वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत करण्यात आली आहे.



अवधानी या सन २००५-०६ पासून वन्यजीव संरक्षण, सर्पमित्र आणि निसर्ग अभ्यासक म्हणून कार्यरत आहेत. शालेय जीवनापासूनच त्यांनी सापांविषयी जनजागृती करण्याचे काम हाती घेतले आहे. विविध शाळा, महाविद्यालये तसेच ग्रामीण भागात त्यांनी व्याख्याने, प्रदर्शने आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित केले आहेत.

सापांच्या फ्लेक्स फोटोच्या माध्यमातून सापांची ओळख, विषारी व बिनविषारी साप, सापांचे विषप्रकार, सर्पदंश टाळण्याचे उपाय आणि सर्पदंशानंतर घ्यावयाची काळजी याबाबत त्यांनी समाजात व्यापक जनजागृती केली आहे. तसेच वन्यजीव छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून निसर्ग संवर्धनाचा संदेश देण्याचे कार्य त्या सातत्याने करत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत वाइल्डलाइफ प्रोटेक्शन अॅण्ड रिसर्च सोसायटी इंडिया, सातारा यांनी त्यांना २०१७ मध्ये राज्यस्तरीय सर्पमित्र पुरस्काराने सन्मानित केले आहे. तसेच अॅग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, शारदानगर (बारामती) यांनी २०१८ मध्ये शारदा सन्मान पुरस्कार देऊन गौरव केला आहे. सध्या त्या एन्व्हायरमेंट कन्झर्वेशन ऑर्गनायझेशन, दौंड या संस्थेच्या उपाध्यक्षा म्हणून कार्यरत असून, या संस्थेमार्फत निसर्ग जनजागृती, वृक्षारोपण, वन्यजीव बचाव, व्याख्याने आणि छायाचित्र प्रदर्शनाचे काम करत आहेत. महाराष्ट्र शासनाने त्यांच्या कार्याची दखल घेत ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली असून, निसर्ग संरक्षण व व्यवस्थापन अधिक बळकट करण्यासाठी पुढील काळात अधिक जोमाने काम करणार असल्याचे गायत्री अवधानी (राजगुरव) यांनी सांगितले आहे.

## स्वच्छता कर्मचाऱ्यांना सुरक्षा साहित्याचे वाटप

### कामगार दिनानिमित्त सासवड नगरपालिकेचा पुढाकार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधत सासवड नगरपालिकेकडून स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा साहित्याचे वाटप करण्यात आले. राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला असून, शहरातील स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात आले.




सासवड नगरपरिषदेसमोर कामगार दिनानिमित्त स्वच्छता कर्मचाऱ्यांना सुरक्षा साहित्याचे वाटप करताना नगराध्यक्षा आनंदी चंद्रकांत जगताप, आरोग्य सभापती राजन जगताप, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, गटनेते अजित जगताप तसेच इतर पदाधिकारी, अधिकारी व स्वच्छता कर्मचारी.

या अंतर्गत हॅन्ड ग्लोज, मास्क, अॅप्रन, सेफ्टी शूज आणि हेल्मेट किटचे वितरण करण्यात आले. धोकादायक परिस्थितीत काम करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी हे साहित्य उपयुक्त ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नगरपालिकेच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा आनंदी चंद्रकांत जगताप, आरोग्य सभापती राजन जगताप, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, गटनेते अजित जगताप यांच्या हस्ते साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सेवाभावाचे कौतुक करत त्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमास महिला व बालकल्याण समिती उपसभापती लीना सौरभ वढणे, नगरसेविका स्मिता उमेश जगताप, पाणीपुरवठा समिती सभापती ज्ञानेश्वर साधू गिरमे, विरोधी पक्षनेते वैभव बबनराव टकले यांच्यासह नगरपरिषदेचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## बारामतीत अतिक्रमण नियमितीकरणाबाबत अंमलबजावणी करण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत शासकीय जमिनीवरील १ जानेवारी २०११ पर्यंतच्या निवासी अतिक्रमणांना नियमित करण्याबाबत राज्य शासनाने २५ मार्च २०२६ रोजी महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला असला, तरी बारामती तालुक्यात त्याची अंमलबजावणी अद्याप सुरू न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या निर्णयामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू नागरिकांना त्यांच्या निवासासाठी कायदेशीर संरक्षण मिळण्याची संधी उपलब्ध झाली असली, तरी प्रशासनाकडून ठोस हालचाल न झाल्याने अनेक पात्र लाभार्थी अजूनही वंचित आहेत. स्थानिक स्तरावर या योजनेबाबत पुरेशी जनजागृती न झाल्यामुळे अनेक नागरिकांना शासन निर्णयाची माहितीच नाही. परिणामी, प्रत्यक्ष गरजूंना लाभ मिळण्याऐवजी योजना कागदोपत्रीच राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



# आमदार आशिष शेलार खंडोबा चरणी लीन

## भाजप कार्यकर्त्यांकडून स्वागत ,मंदिर व्यवस्थापकाकडून पत्रकारांशी गैरवर्तन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी :** महाराष्ट्र राज्याचे कुलदैवत खंडोबा टेम्पल जेजुरी येथे राज्य विधानसभेचे सदस्य व सांस्कृतिक राज्यमंत्री आशिष शेलार यांनी दर्शन घेतले. यावेळी जेजुरी शहरातील भाजप कार्यकर्त्यांच्या वतीने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी जेजुरी शहर मंडल अध्यक्ष सचिन पेशवे, पुणे जिल्हा उपाध्यक्ष अलका शिंदे, गणेश भोसले, मंगल पवार, विशाल बारसुडे, प्रसाद अत्रे आदी उपस्थित होते.दरम्यान, देवस्थान कार्यालयातील विश्वस्त समितीकडून पत्र्याच्या पेटीत ठेवण्यात आलेल्या सुमारे ४२ किलो वजनाच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक खंडा महातलवारीचे आशिष शेलार यांनी दर्शन घेतले. देवसंस्थानचे अध्यक्ष विश्वास पानसे, माजी विश्वस्त प्रमुख मंगेश घोणे, ट्रस्टी डॉ. राजेंद्र खेडेकर यांच्या हस्ते शेलार यांचा घोंगडी, काठी व पगडी देऊन सत्कार करण्यात आला.

या ऐतिहासिक तलवारीला राज्य शस्त्र म्हणून घोषित करण्याबाबत तसेच ती मेघडंबरीत ठेवून सर्वांसाठी खुली करण्याबाबत प्रश्न विचारण्यात आला असता, शेलार यांनी पत्रकारांशी संवाद टाळल्याचे दिसून आले. यासंदर्भात भाजप आमदार संजय केळकर यांनी यापूर्वीच या शस्त्राला राज्य आश्रय मिळावा, यासाठी विधानभवनात प्रश्न उपस्थित करण्याचे आश्वासन दिले होते. सध्या ही तलवार पत्र्याच्या पेटीत ठेवलेली असून ती प्रेक्षणीय स्वरूपात मांडावी, तसेच तिची माहिती हिंदी, इंग्रजी व मराठी भाषेत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांसह विविध प्रतिष्ठानांकडून करण्यात आली आहे.तसेच, पुरातत्व विभागाच्या सुरू असलेल्या दुरुस्ती कामांची पाहणीही शेलार यांनी केली. दरम्यान, जेजुरी गडावर सामान्य नागरिकांना बंदी असलेल्या वाहन मार्गावरून शेलार यांचा ताफा नेण्यात आल्याची चर्चा रंगली आहे.



### व्यवस्थापकाची मगरुरी

शनिवारी राज्यमंत्र्यांच्या भेटीच्या पार्श्वभूमीवर शहर भाजपकडून पत्रकारांना माहिती देण्यात आली होती. मात्र, गडावर वृत्तांकनासाठी गेलेल्या पत्रकारांना देवसंस्थान समितीचे मंदिर व्यवस्थापक आशिष भाटे यांनी मंदिरात प्रवेश देण्यास मज्जाव केला.याबाबत विचारणा केल्यावर विश्वस्तांच्या आदेशाने प्रवेश नाकारला असे उत्तर देण्यात आले. या प्रकारामुळे पत्रकारांनी संताप व्यक्त करत या कृत्याचा व ट्रस्टींच्या मनमानी कारभाराचा जाहीर निषेध केला आहे.

# एकीकडे दंडात्मक कारवाई, दुसरीकडे अवैध मद्य विक्रेत्यांना मोकळीक!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारगाव (ता. आंबेगाव) :** परिसरात मद्यप्राशन करून वाहन चालवणाऱ्यांविरोधात पारगाव पोलिसांकडून अलीकडे कठोर कारवाई करण्यात येत आहे. रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने ही मोहीम महत्त्वाची मानली जात असून, अनेक वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.




मात्र, याच वेळी परिसरात अवैधरित्या मद्य विक्री करणाऱ्यांवर अपेक्षित ती कारवाई होत नसल्याचे चित्र दिसत आहे. काही ठिकाणी उघडपणे बेकायदेशीर मद्य विक्री सुरू असल्याच्या तक्रारी स्थानिकांकडून केल्या जात आहेत. त्यामुळे एकीकडे कारवाई, तर दुसरीकडे दुर्लक्ष अशी दुहेरी भूमिका पोलिसांकडून घेतली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, जर अवैध मद्य विक्रीवर प्रभावी नियंत्रण ठेवले गेले, तर मद्यप्राशन करून वाहन चालवण्याच्या घटनांनाही आळा बसेल. त्यामुळे पोलिसांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन अवैध व्यवसायांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, पारगाव पोलिसांनी या संदर्भात अधिक तपास सुरू असल्याचे सांगितले असून, अवैध मद्य विक्री करणाऱ्यांवरही लवकरच कारवाई केली जाईल, असे संकेत दिले आहेत.

सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांनी काही दिवसांपूर्वी पारगाव पोलीस स्टेशनचा पदभार स्वीकारला असून, त्यांच्या नियुक्तीनंतर स्थानिक पातळीवर मोठ्या अपेक्षा व्यक्त होत आहेत. विशेषतः पारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर, तसेच चोरून होणाऱ्या वाळू उपशावर कठोर कारवाई होणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

गेल्या काही काळात या भागात बेकायदेशीर वाळू उत्खनन आणि इतर अवैध व्यवसाय वाढल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. त्यामुळे नवीन अधिकाऱ्यांनी या प्रकरणांकडे गांभीर्याने लक्ष देत त्वरित कारवाई करणे गरजेचे असल्याची भावना स्थानिक नागरिकांमध्ये आहे.

सचिन कांडगे यांच्या कार्यपद्धतीकडून नागरिकांना सकारात्मक बदलाची अपेक्षा असून, कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी ठोस पावले उचलली जातील का, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल.

# तीन वर्षीय चिमुकलीवरील अत्याचारानंतर हत्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भोर:** नसरापूर (ता. भोर) परिसरात घडलेल्या ३ वर्षीय चिमुकलीवरील कथित लैंगिक अत्याचार व निर्घृण हत्येच्या घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला असून ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणात स्थानिक नागरिकांच्या सतर्कतेमुळे आणि सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने पोलिसांनी ६५ वर्षीय संशयित आरोपीला ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मयत चिमुकली सुट्टीनिमित्त आपल्या आजीकडे नसरापूर येथे आली होती. साळवडे गावातील भिवाजी कांबळे (वय ६५) याने तिला फूस लावून जवळील एका गोठ्यात नेल्याचा आरोप आहे. त्या ठिकाणी तिच्यावर अत्याचार करून दगडाने ठेचून हत्या केल्याचा प्राथमिक संशय व्यक्त करण्यात येत आहे. त्यानंतर आरोपीने मृतदेह लपविण्याचाही प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, चिमुकली बेपत्ता झाल्यानंतर तिचा शोध घेण्यासाठी स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम हाती घेतली. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी केली असता आरोपी चिमुकलीला घेऊन जाताना दिसल्याचे स्पष्ट झाले. यानंतर संतप्त नागरिकांनी आरोपीचा शोध घेतला असता तो नसरापूरमधील काळुबाई मंदिर परिसरात आढळून आला. ग्रामस्थांनी त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.गोठ्यात चिमुकलीचा

### सीसीटीव्ही तपासातून ६५ वर्षीय आरोपी अटकेत

मृतदेह आढळल्यानंतर ग्रामस्थांचा संताप अनावर झाला. आरोपीविरोधात कठोर कारवाईची मागणी करत नागरिकांनी ठिय्या आंदोलन केले. त्यानंतर चेलाडी येथील पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन छेडण्यात आले. या आंदोलनामुळे सुमारे १ ते २ तास वाहतूक ठप्प झाली होती, ज्यामुळे परिसरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती.या घटनेत आणखी एक धक्कादायक बाब समोर आली असून नसरापूर ग्रामपंचायतीचे अनेक सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत असल्याचे उघड झाले आहे. हे कॅमेरे कार्यरत असते तर तपास अधिक वेगाने आणि प्रभावीपणे होऊ शकला असता, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.घटनेची गंभीरता लक्षात घेता पुणे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक संदीप गिल यांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी संतप्त नागरिकांशी संवाद साधत आरोपीविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल तसेच हा खटला जलदगती न्यायालयात चालवून पीडितेला न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले.दरम्यान, या अमानुष घटनेच्या निषेधार्थ नसरापूरमध्ये बंद पाळण्यात आला असून भैरवनाथ मंदिर ते चेलाडी चौक दरम्यान निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. पीडितेला न्याय मिळालाच पाहिजे अशी एकमुखी मागणी संपूर्ण परिसरातून होत आहे.कायदेशीर दृष्टिकोनातून पाहता, सदर प्रकरण अत्यंत गंभीर स्वरूपाचे असून यात लैंगिक अत्याचार व खून यांसारखे संज्ञेय गुन्हे लागू होतात. अल्पवयीन मुलीवरील अत्याचारामुळे संरक्षण बालक लैंगिक अपराधांपासून (झजउडज) कायद्यांतर्गत कठोर कलमे लागू होण्याची शक्यता असून आरोपीविरुद्ध कठोर शिक्षा व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

द·ख·ल



## श्रमिकनगरला लाल झेंडा फडकवून कामगार दिन साजरा

**अहिल्यानगर** : श्रमिकनगरला विडी कामगारांच्या उपस्थितीमध्ये कामगार दिवस साजरा करण्यात आला. श्रमिक हाऊसिंग सोसायटी, लालबावटा विडी कामगार युनियन व आयटक संघटनेच्या वतीने कामगार चळवळीचा प्रतिक असलेला लाल झेंडा फडकविण्यात आला.

मार्कंडेय विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष अशोक सब्बन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी श्रमिक जनता नगर सोसायटीचे चेअरमन विलास सग्गम, सेक्रेटरी शंकर येमूल, सहसेक्रेटरी दत्तात्रय भीमनाथ व सर्व पदाधिकारी तसेच माजी अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम, राजू म्याना, भीमराज कोडम, बालाजी मंदिराचे अध्यक्ष विनोद म्याना, तसेच मार्कंडेय विद्यालयाचे मुख्याध्यापक शशीकांत गोरे, मुख्याध्यापिका विद्या दगडे, विडी कामगार युनियनच्या उपाध्यक्षा कॉ. भारती न्यालपेल्ली, कॉ. सगुणा श्रीमल, कॉ. संगीता कोंडा, कॉ. भाग्यलक्ष्मी गड्डम, कॉ. पूजा न्यालपेल्ली आदींसह शिक्षक व शिक्षतेतर कर्मचारी आणि विद्यार्थी तसेच श्रमिकनगर मधील सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अशोक सब्बन यांनी कामगार दिनाची माहिती देऊन, कम्युनिस्ट पक्षाच्या झेंड्याखाली आपण किती लढे करून हक्क मिळवले याचा आढावा घेतला. ते म्हणाले की, मोठ्या संघर्षानंतर कामगारांनी आपला हक्क मिळवला आहे. महिला-पुरुष कामगारांमधील भेदभाव नाहिसा झाला. पूर्वी भांडवलदार वर्ग कामगारांना गुलामासारखे राबवत होते. मात्र कामगार कायद्यासाठी मोठा उठाव करावा लागला. आजही कामगारांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी संघटितपणे संघर्ष करावा लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## नील क्रांती चौकात बुद्ध पौर्णिमेनिमित्त सरबत वाटप

**अहिल्यानगर** : बुद्ध पौर्णिमे निमित्त शहरातील दिल्ली गेट येथील नील क्रांती चौक येथे अरविंद साळवे मित्र मंडळाच्या वतीने सरबत वाटपाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा देण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना थंडगार सरबत वाटून मानवतेचा संदेश दिला. या वेळी अरविंद साळवे, चेतन साळवे, आनंद साळवे, भावेश साळवे, महेश भोसले, अशोक पारधे, गणेश पाखरे, हेमंत साळवे, गिरीश जाधव, सलीम शेख, भगवान साळवे, साजीद सय्यद, अन्सार शेख, वृषाल साळवे, प्रबुद्ध कांबळे, राहुल साळवे, संदेश भोसले, जाफर बेग, सुशांत शिरसाठ आदी उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून बुद्धांच्या विचारांचा प्रसार करत समाजात बंधुता, समता आणि सेवा भावना रुजविण्याचा संदेश देण्यात आला.

## वैशाली जुन्नरकर यांना 'शिक्षण जीवनगौरव' पुरस्कार श्रीलंकेत प्रदान



**शेवगाव** : बाळासाहेब भारदे विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका सौ. वैशाली जुन्नरकर यांना त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ आणि उल्लेखनीय योगदानाबद्दल 'शिक्षण व समाजसेवेतील उत्कृष्टतेचा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. 'शिक्षणातील जीवनगौरव पुरस्कार' या श्रेणीअंतर्गत हा सन्मान त्यांना श्रीलंकेत प्रदान करण्यात आला आहे. वैशाली जुन्नरकर यांनी आपल्या अध्यापन कारकिर्दीत केवळ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवरच भर दिला नाही, तर अनेक सामाजिक उपक्रमांमध्येही हिरीरीने सहभाग नोंदवला आहे. त्यांच्या याच अष्टपैलू कार्याची दखल घेत संस्थेच्या वतीने त्यांना हा मानाचा चषक आणि सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. पुरस्काराला उत्तर देताना जुन्नरकर म्हणाल्या की, हा पुरस्कार म्हणजे माझ्या आजवरच्या कार्याची पावती असून, यामुळे भविष्यात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे. विद्यालयाने आणि समाजाने माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी ऋणी आहे. वैशाली जुन्नरकर यांच्या या यशाबद्दल बाळासाहेब भारदे विद्यालयाच्या व्यवस्थापन समितीने, मुख्याध्यापकांनी आणि शिक्षक वृंदाने त्यांचे अभिनंदन केले असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# उन्हात होरपळ, विजेचा खेळखंडोबा

## आ. रोहित पवारांच्या नेतृत्वाखाली कर्जत-जामखेडमध्ये ठिय्या आंदोलन
## वीज तात्काळ सुरळीत करण्याचं महावितरणचं आश्वासन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** : कर्जत-जामखेड तालुक्यातील तीव्र वीजटंचाई आणि अनियमित वीजपुरवठ्याच्या प्रश्नावर आज आ. रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली कर्जत येथील महावितरण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आलं. नागरिकांच्या वाढत्या त्रासाच्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन करण्यात आले. मतदारसंघात ऐन उन्हाळ्यातील तीव्र उकाड्यात विजेच्या अनियमित व खंडित पुरवठ्यामुळे नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. तापमान ४० ते ४२ अंशांच्या पुढे गेलेलं असताना वीज वेळेवर उपलब्ध होत नसल्याने सर्वसामान्यांचं दैनंदिन जीवन विस्कळीत झालं आहे. लहान मुलं, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना उकाड्याचा तीव्र सामना करावा लागत असून, वाडी-वस्त्यांवर सिंगल फेज वीजही उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. शेतीसाठी आवश्यक असलेला थ्री फेज वीजपुरवठा अखंडित मिळत नसल्याने उन्हाळी पिकांचं नुकसान होत आहे.



जळालेले डीपी वेळेत बदलले जात नाहीत, कोटेशन भरूनही नवीन वीजजोडण्या मिळत नाहीत, पूर्ण दाबाने वीजपुरवठा होत नाही, तसेच 'मागेल त्याला सोलर' योजनेअंतर्गत इंस्टॉलेशन व देखभाल कामांमध्ये विलंब होत असल्याच्या तक्रारीही नागरिकांनी मांडल्या. चिलवडी व माही जळगाव उपकेंद्रांची प्रलंबित कामेही अद्याप पूर्ण झालेली नाहीत. विशेषतः ए.जी. फिडरवर सायंकाळी ६ ते ९ या वेळेत वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने नागरिकांच्या अडचणीत आणखी भर पडत आहे. या पार्श्वभूमीवर आ. रोहित पवार यांनी वारंवार पाठपुरावा करूनही ठोस तोडगा न निघाल्याने नागरिकांचा संताप वाढला होता.

या गंभीर प्रश्नावर आज आ. रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली कर्जत येथील महावितरण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आलं. या आंदोलनात मतदारसंघातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आ.रोहित पवार यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना जाब विचारत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली. दरम्यान, आंदोलनानंतर महावितरणच्या अधिकाऱ्यांनी परिस्थितीची दखल घेत लवकरात लवकर वीजपुरवठा सुरळीत करण्याचं आश्वासन अधीक्षक अभियंता पवार यांनी यावेळी दिले. या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आलं. मात्र, या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणीकडे कर्जत-जामखेडमधील नागरिकांचं लक्ष लागून आहे.

या आंदोलनात रघु आबा काळदाते, नामदेव बापू राऊत, विश्वनाथ राऊत, विशाल म्हेत्रे, गुलाबकाका तनपुरे, मंगेश आजबे, अमृत लिंगडे, प्रशांत राळेभात, रामशेठ कानगुडे, अनिल पांडुळे, दीपक शिंदे, विष्णू नाना मोंढळे, ज्ञानदेव लष्कर, वसीम सय्यद, किशोर तापकीर, राजेंद्र गोरे, सुनील उबाळे, बापू कार्ले, बाबासाहेब गांगर्डे, राजेंद्र पवार, मनोज गायकवाड, अमोल पाटील, बाळासाहेब सपकाळ, किसन बापू ढवळे , संतोष नाना निगुडे, बिबिशन धनवडे, रज्जाक शेख, वैभव काळे, मनोज गायकवाड, राजेंद्र भांडवलकर, महादेव मोटे, डॉ. चंद्रकांत कोरडे, संदीप गांगर्डे, दत्ता साळुंके, गणेश चव्हाण, दादा राजे भोसले, विलास जगदाळे, रावसाहेब जाधव, सतीश चव्हाण, बजरंग डुचे, अशोक गीते, नय्युम शेख, दिलीप जाधव, महेश काळे यांच्यासह कर्जत जामखेड मधील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भिंगारमध्ये वृक्षारोपणाचा उपक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने छावणी परिषदेतील कामगारांचा सत्कार करून त्यांच्या श्रमाचे कौतुक करण्यात आले, तसेच भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या भव्य पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पवृष्टी करून अभिवादन करण्यात आले.



या कार्यक्रमास छावणी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी प्रमुख उपस्थित होत्या. यावेळी डॉ. दमन काशीद, हरदिन ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, सर्वेश व प्रांजली सपकाळ, संगीता सपकाळ, जहीर सय्यद, जैद सय्यद, जियान सय्यद, सोपानराव साळवे, सचिन परदेशी यांच्यासह अनेक सदस्य उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी विजयवंशी यांच्या हस्ते छावणी परिषदेतील कामगार गणेश भोर, दीपक अमृत, रमेशराव वराडे, ताराचंद ठोकळ, अशोकराव पराते, अनिलराव हळगावकर, राजेश तेजी आणि संजय मोरकरोसे यांचा सन्मान करण्यात आला. तसेच योग भवनासाठी शशिकांत पवार यांनी घड्याळ भेट दिले.

यावेळी डॉ. दमन काशीद,सचिन चोपडा ,संजय सपकाळ, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे यांची भाषणे झाली.

## 'सनराईज'ची शतकी झेप!
### बारावीच्या तिन्ही शाखांचा १००% निकाल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री





**श्रीगोंदा** : शैक्षणिक स्पर्धेच्या कठीण वातावरणात श्रीगोंदा येथील सनराईज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स (कनिष्ठ महाविद्यालय) यांनी बारावी परीक्षेत तिन्ही शाखांचा १०० टक्के निकाल लावत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी जाहीर केलेल्या २०२५-२६ च्या निकालात 'सनराईज'ने गुणवत्ता आणि सातत्याची छाप पुन्हा एकदा उमटवली आहे, अशी माहिती प्राचार्या राजेश्री शिंदे यांनी दिली.

महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. अनुराधा ज्ञानेश्वर हराळ हिने ८५.१७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. मयुरी उद्धव वाळके (७७.३३%) हिने द्वितीय, तर सार्थक सूर्यभान टकले (७५.५०%) याने तृतीय क्रमांक मिळवला.

माहिती तंत्रज्ञानातही अव्वल कामगिरी

माहिती तंत्रज्ञान विषयात कु. श्रेया धर्मेद्र जगताप हिने ९७ गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. अनुराधा हराळ व अनुष्का दत्तात्रय फटे यांनी प्रत्येकी ९६ गुण मिळवत द्वितीय स्थान पटकावले. संस्थेचे अध्यक्ष सतीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मोहटादेवी सेवा प्रतिष्ठानतर्फे 'केजी टू पीजी' शिक्षणाची सुविधा तालुक्यातील वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी अल्प शुल्कात उपलब्ध करून देण्यात आली आहे. चालू शैक्षणिक वर्षापासून इयत्ता अकरावीसाठी माहिती तंत्रज्ञान व कॉम्प्युटर सायन्स हे विषय सुरू करण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची नवी दिशा मिळणार आहे.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी वर्षभर विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जात असल्याचा सकारात्मक परिणाम निकालातून दिसून आला आहे. यंदा अनेक महाविद्यालयांचे निकाल घसरले असतानाही 'सनराईज'ने शंभर टक्के निकालाची किमया साधत शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे.यशस्वी विद्यार्थ्यांचे शिक्षक व पालकांकडून अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## निमगाव वाघात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत कार्यालय व नवनाथ विद्यालय परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामपंचायतमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने सत्कार करून त्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव करण्यात आला.




कार्यक्रमाच्या प्रारंभी नवनाथ विद्यालयात मेजर संजय खळदकर यांच्या हस्ते, तर ग्रामपंचायत कार्यालयात उपसरपंच किरण जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताच्या सुमधुर वातावरणात उपस्थितांनी राज्याच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचा संकल्प केला.

कार्यक्रमास नवनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, अरुण कापसे, सोसायटीचे चेअरमन अतुल फलके, प्रमोद जाधव, मयुर काळे, ज्ञानदेव कापसे, स्वाती इथापे, शरद भोस, आप्पासाहेब ठाणगे, तेजस केदारी, तुकाराम पवार, रेखा जरे, निकिता रासकर, तृप्ती वाघमारे, दिपाली ठाणगे, मंदा साळवे, पै. संदीप डोंगरे, प्रमोद थिटे यांच्यासह शिक्षक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शहरटाकळी कनिष्ठ महाविद्यालयाची निकालाची परंपरा
### विज्ञान शाखेचा १०० टक्के तर कला शाखेचा ९३ टक्के निकाल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शहरटाकळी** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या इयत्ता बारावीच्या निकालात शहरटाकळी येथील शहरटाकळी कनिष्ठ महाविद्यालयाने आपले वर्चस्व कायम राखले आहे. महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा निकाल ९३.१० टक्के लागून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

विज्ञान शाखेत सार्थक लोढे प्रथम

विज्ञान शाखेतून लोढे सार्थक तुकाराम याने ६६.६७%गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. निंबाळकर सृष्टी अरुण (६५.६७%) हिने द्वितीय ,तर पवार शुभांगी राजेंद्र (६४.६७%) हिने तृतीय क्रमांक पटकावला कला शाखेत प्रगती गहाळ अव्वल कला शाखेतून गहाळ प्रगती विठ्ठल हिने ७७.५०% गुणांसह दहिगाव ने केंद्रात प्रथम क्रमांक मिळवला. झेंडे गायत्री भाऊराव(७०.५०%) हिने द्वितीय आणि खरड अमृता सुनील (६४.३७%) हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. विद्यालयाचे प्राचार्य कांतेश्वर ढोले, प्र. प्राचार्य सुनील जायभाये आणि सर्व प्राध्यापक, शिक्षक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा.सचिन गाडे, प्रा.राहुल गायके, प्रा.रामेश्वर तांबे, प्रा.बाळकृष्ण ठोंबळ, प्रा.विद्यावर्धिनी मुळे, प्रा.रीना हांडे, प्रा.सचिन कमानदार, प्रा.बाळासाहेब दिंडे, प्रा.निलोफर शेख, प्रा.प्रवीण लद्दे यांचे मार्गदर्शन लाभले.

## प्राथमिक विद्यामंदिर निर्मलनगर शाळेत
# महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : १ मे २०२६ रोजी प्राथमिक विद्यामंदिर, निर्मलनगर, शेवगाव येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे निरीक्षक श्री. शिंदे गुरुजी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय गीताने झाली आणि संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावना व्यक्त करणाऱ्या घोषणांनी दुमदुमून गेला. श्री. शिंदे गुरुजी यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. परवीन पटेल मॅडम व पालक प्रतिनिधी म्हणून डॉ. नितीन देशमुख सर उपस्थित होते. सहशिक्षक श्री. मंगेश वसावे यांनी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना मेहनत, प्रामाणिकपणा आणि देशप्रेम या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून इयत्ता चौथीच्या वर्गातून प्रथम तीन क्रमांने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना श्री. प्रा.गोरक्षनाथ पुजारी सर यांच्या कडून रोख स्वरूपात बक्षीस देण्यात आले. त्यानंतर शाळेचे वार्षिक नियतकालिक *वाटचाल* २०२५-२६ या अंकाचे प्रमुख पाहुणे व पालक यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. विद्यार्थांना खाऊचे वाटप करून निकाल देण्यात आला. या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रीय गीत व राष्ट्रगीताने करण्यात आली. या कार्यक्रमास श्री. टेकुळे एम. एस. श्रीम. नरवडे एस. एच. श्रीम. पोकळे एस. बी. श्रीम. आव्हाड पी. बी. श्रीम. वाडेकर एस. एस. श्रीम. सुडके ए. जे. श्रीम. पवार एस. डी. श्रीम. मंचरे ए. जी. श्रीम. म्हस्के ए. बी. श्रीम. बुधवंत पी. ए., विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## कर्जत पोलीस उपविभागासाठी अत्याधुनिक वाहन उपलब्ध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : बदलत्या काळानुसार पोलीस खात्यात ही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. अत्याधुनिक तपास यंत्रणेसह अत्याधुनिक वाहने पोलीस खात्यात दाखल झालेली असून आगामी काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी या वाहनांची मोठ्या प्रमाणावर मदत होईल असे प्रतिपादन पोलीस उपाधीक्षक प्रवीण लोखंडे यांनी केले. ते एक मे महाराष्ट्र दिन कर्जत पोलीस ठाण्यात दंगल नियंत्रक अत्याधुनिक पोलीस वाहन पूजन प्रसंगी बोलत होते.

याप्रसंगी कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सोपानराव शिरसाठ, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप बोराडे, बाळासाहेब मुळीक, गुप्त वार्ता विभागाचे पोलीस अंमलदार दीपक कोल्हे, यांच्यासह सर्व पोलीस अंमलदार होमगार्ड उपस्थित होते. अहिल्यानगर पोलीस विभागाच्यावतीने दंगल नियंत्रण व कायदा व सुव्यवस्था राखणे कामी या अत्याधुनिक वाहनाची मोठी मदत होईल. या वाहनावर चारी बाजूने संरक्षक जाळी सह मोठे प्रकाशझोत असणारी यंत्रणा उपलब्ध असून लांब पल्ल्याची अत्याधुनिक कॅमेरे, वाहनावर स्वयंचलित मनोरा, या मनोऱ्यावरून पोलीस कोणत्याही प्रकारच्या गर्दीवर सहज नियंत्रण मिळू शकतील अशी तजवीज करण्यात आली आहे. या वाहनाद्वारे कुठल्याही परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी पोलिसांना मदत होईल असे पोलीस उपअधीक्षक प्रवीण लोखंडे यांनी म्हंटले.




## उन्हाची तीव्रता वाढल्याने तिसगावच्या बाजारपेठेत शुकशुकाट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**तिसगाव** : पाथर्डी तालुक्यातील तिसगाव एक मोठी व्यापारी बाजारपेठ म्हणून ओळखली जाते. या बाजारपेठेमध्ये सातत्याने ग्राहकांची मोठी वर्दळ असते मात्र एप्रिल संपून मे महिना सुरू झाला आहे उन्हाची तीव्रता खूपच वाढल्याने दुपारी बारा वाजल्यापासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत तिसगावच्या बाजारपेठेत अक्षरशः शुकशुकाट दिसून येत आहे.सध्या लग्नसराई जोरात सुरू आहे त्यामुळे तिसगाव येथे सोने-चांदी कपडे भांडी खरेदी करण्यासाठी ग्राहकांची मोठी वर्दळ असते मात्र दुपारच्या सुमारास तिसगावच्या व्यापारी बाजारपेठेत अक्षरशा शुकशुकाट दिसून येतो. उन्हाचा पारा चाळीस डिग्रीपर्यंत पोहोचला असल्याने दुपारच्या सुमारास घराच्या बाहेर पडण्यास कोणीही धजावत नाही. त्यामुळे दुपारच्या वेळेस तिसगाव बाजारपेठेत खरेदीदारांची संख्या कमी राहते. सायंकाळी मात्र सर्वच दुकानांमध्ये ग्राहकांची मोठी गर्दी होते. उन्हाच्या तीव्रतेचा आर्थिक व्यवस्थेवर देखील काहीसा परिणाम झाला आहे.

दरम्यान, उन्हाची तीव्रता वाढल्याने तिसगाव बाजारपेठेत दुपारच्या सुमारास तुरळक प्रमाणात ग्राहक दिसून येतात त्यामुळे उन्हाच्या तीव्रतेचा परिणाम येथील सर्व छोट्या-मोठ्या व्यवसायावर होत असल्याची भावना व्यावसायिक संतोष छाजेड,शंकरराव उंडाळे, सुनिल शिंगवी ,योगेश मैड,सोमनाथ कातखडे, सुरेश चव्हाण,प्रणील सावंत,पिंटू परमार,यशपाल गांधी,मधुकर वांढेकर,शिवाजी सावंत यांनी व्यक्त केले आहे.



दैनिक
राष्ट्र सह्याद्री

## रमेश तगरे यांना उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाराष्ट्र पोलीस पदक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**टाकळीभान :** गावचे भूमिपुत्र सध्या पोलीस सेवेमध्ये ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे हवालदार म्हणून सेवा देत असलेले रमेश सिताराम तगरे यांना ठाणे मध्यवर्ती कारागृह विभागात उत्कृष्ट कामगिरीबद्दल ठाणे येथील पोलीस अधीक्षक राणी भोसले, संतोष रहाटे सुभेदार ठाणे मध्यवर्ती कारागृह यांच्या हस्ते महाराष्ट्र पोलीस पदक सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक प्रदान करण्यात आले. महाराष्ट्र पोलीस सेवेतील कारागृह विभागातील कर्मचारी /अधिकारी यांच्या प्रशंसनिय सेवेबद्दल सन्मान समारंभामध्ये हा सन्मान करण्यात आला. त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल व महाराष्ट्र पोलीस पदक प्राप्त झाल्याबद्दल टाकळीभान येथील मान्यवर ,पदाधिकारी, ग्रामस्थ, नातेवाईक व मित्र परिवार यांनी तगरे यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.



## गोंडेगावात महसूल पथकाची कारवाई

### अवैध वाळूसह डंपर जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** तालुक्यातील गोंडेगाव परिसरात अवैध वाळू वाहतुकीविरोधात महसूल विभागाच्या पथकाने धडक कारवाई करत अंदाजे ३ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी अज्ञात डंपर चालकाविरोधात श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवार दि. ३० एप्रिल रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास तहसीलदारांच्या आदेशानुसार अवैध गौणखनिज वाहतुकीवर प्रतिबंध घालण्यासाठी महसूल विभागाचे पथक गोंडेगाव-मातुलठाण रोड परिसरात गस्त घालत होते. यावेळी पथकाला पांढऱ्या रंगाचा विनानंबर डंपर संशयास्पदरीत्या वाळू वाहतूक करताना आढळून आला. पथकाने वाहनाचा पाठलाग केला असता चालकाने अंधाराचा फायदा घेत चारमाई वस्ती परिसरात डंपरमधील वाळू एका घरासमोर खाली करून घटनास्थळावरून पलायन केले.

त्यानंतर महसूल अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पंचनामा करून डंपर व वाळू जप्त केली. जप्त मुद्देमालामध्ये अंदाजे ३ लाख रुपयांचा विनानंबर डंपर तसेच २० हजार रुपयांची वाळू असा एकूण ३ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## बारामतीत 'हनी ट्रॅप' प्रकरणाचा पर्दाफाश

### अॅट्रॉसिटीच्या धमकीवर खंडणी उकळणाऱ्या टोळीवर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** शहरात 'हनी ट्रॅप'च्या माध्यमातून शासकीय अधिकाऱ्याला जाळ्यात अडकवून अॅट्रॉसिटी कायद्याच्या भीतीचा गैरवापर करत खंडणी उकळणाऱ्या टोळीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी बारामती शहर पोलीस ठाण्यात भा. न्या. सं. कलम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी सखोल तपास सुरू केला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे शासकीय सेवेत कार्यरत अधिकारी असून ते बारामतीतील एका प्रशिक्षण केंद्रात गेस्ट लेक्चरर म्हणून येत असताना त्यांचा काही व्यक्तींशी परिचय झाला होता.

त्यानंतर एका महिलेकडून त्यांना वारंवार फोन व व्हिडिओ कॉल येऊ लागले. सुरुवातीला मार्गदर्शनाच्या नावाखाली सुरू झालेला संवाद पुढे जाणीवपूर्वक जवळीक वाढवत 'हनी ट्रॅप'च्या जाळ्यात अडकवण्याच्या उद्देशाने असल्याचे स्पष्ट झाले. संशय आल्याने फिर्यादी यांनी संबंधित मोबाईल क्रमांक ब्लॉक केला.




मात्र, आरोपींनी दुसऱ्या क्रमांकावरून पुन्हा संपर्क साधत संवाद सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला. काही दिवसांनंतर फिर्यादींसोबत झालेल्या व्हिडिओ कॉलचे स्क्रीन रेकॉर्डिंग करून ते व्हायरल करण्याची धमकी देण्यात आली. याचाच आधार घेत आरोपी व त्यांच्या साथीदारांनी संगनमताने खोटा बलात्कार व अॅट्रॉसिटी कायद्याखाली गुन्हा दाखल करण्याची भीती दाखवत मोठ्या रकमेची मागणी सुरू केली.

सुरुवातीला तब्बल ५० लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती. नंतर ती २५ लाख आणि पुढे १० लाख रुपयांपर्यंत कमी करण्यात आली. तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, ५ एप्रिल ते १३ एप्रिल २०२६ या कालावधीत आरोपींकडून सहा वेळा फोन करून खंडणीची मागणी करण्यात आली होती. फिर्यादी यांच्याकडे आयफोन असल्याने कॉल रेकॉर्डिंगची सुविधा नसल्यामुळे त्यांनी स्पीकरवर कॉल ठेवून दुसऱ्या मोबाईलद्वारे संभाषणाचे ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंग केले. या रेकॉर्डिंगमध्ये पैसे दिले नाहीत तर बलात्कार व अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करू, मीडियात बदनामी करू अशा स्पष्ट धमक्या देण्यात आल्याचे आढळून आले आहे. दरम्यान, आरोपींकडून दबाव वाढवत फिर्यादींकडून १ लाख रुपयांची रक्कम उकळण्यात आली. ही रक्कम बारामती एमआयडीसी परिसरातील पेट्रोल पंपाजवळ मध्यस्थामार्फत देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

त्यानंतर फिर्यादींना प्रत्यक्ष भेटीस बोलावून वाहनात बसवून त्यांचा मोबाईल तपासण्यात आला. सुमारे दोन तासांहून अधिक काळ त्यांना दमदाटी व मानसिक दबावाखाली ठेवून पुन्हा मोठ्या रकमेची मागणी करण्यात आल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात 'हनी ट्रॅप', व्हिडिओ रेकॉर्डिंग, ब्लॅकमेलिंग, अॅट्रॉसिटी कायद्याचा गैरवापर आणि खंडणी मागणी अशा स्वरूपाची गुन्हेगारी कारवाई झाल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी फिर्यादीकडील सर्व डिजिटल पुरावे जप्त करून त्यांचा 'हॅश व्हॅल्यू' पंचनामा केला असून आवाजाची वैज्ञानिक पडताळणी (ऋडड), सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण तसेच कॉल डिटेल रेकॉर्ड (उउठ) तपास सुरू आहे.

नागरिकांनी अपरिचित व्यक्तींशी सोशल मीडिया किंवा व्हिडिओ कॉलद्वारे वैयक्तिक संपर्क टाळावा, कोणतीही खाजगी माहिती, फोटो किंवा व्हिडिओ शेअर करू नये, तसेच अशा प्रकारचा 'हनी ट्रॅप' किंवा ब्लॅकमेलिंगचा प्रकार आढळल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, पोलीस उपअधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड व प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रत्नदीप भंडारे व त्यांच्या पथकाने केला आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर :** श्रीरामपूर-पुणतांबा मार्गावर खैरी निमगाव येथील हॉटेल साई गितगंगा समोर अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागेवरच मृत्यू झाला. गुरुवारी ३० एप्रिलला रात्री ८ ते ९ च्या सुमारास श्रीरामपूर-पुणतांबा मार्गावरील खैरी निमगांव येथील हॉटेल साई गितगंगा समोर झालेल्या या अपघातात पुणतांबा येथील गौरव अशोक बनकर (वय २४) हा जागीच ठार झाला.

अपघातानंतर वाहनचालक वाहनासह घटनास्थळावरून पसार झाला. गौरव अशोक बनकर हा त्याच्याजवळील दुचाकीवरून पुणतांब्याच्या दिशेने जात असताना रात्री ८ ते ९ च्या सुमारास भरधाव एका अज्ञात वाहनाने गौरव याच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात गौरव बनकर गाडींसह बऱ्याच अंतरावर रस्त्यावर फरफटत गेला. या घटनेत तो जागेवरच मयत झाला. घटनेनंतर खैरी निमगाव येथील गावकऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर त्यांनी तालुका पोलीस ठाण्यात संपर्क साधत घटनेची माहिती दिली.

त्याला रुग्णवाहिकेतुन श्रीरामपूरच्या दिशेने पाठवून दिले. डॉक्टरांनी तपासून रात्री उशिरा गौरव बनकर यास मृत घोषीत केल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान मयत गौरव बनकर हा श्रीरामपूर शहरातील एका कापड दुकानात कामाला होता. रात्री कामावरून घरी येत असताना ही घटना घडली. सदर तरूणाला बेदरकारपणे चालणाऱ्या वाळूच्या वाहनाने धडक दिल्याचे समजते. या रोडला मोठ्या प्रमाणावर बेकायदा वाळूची वाहने अत्यंत बेदरकारपणे चालवली जातात. त्यामुळे या रोडने जाणाऱ्या दुचाकीस्वारांना जीव मुठीत धरून जावे लागते. गौंधवणी ते पुणतांबा हा रोड सद्या बेकायदा वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांनी पूर्णपणे वेठीस धरला असून काल रात्री गौरव बनकर या तरूणाचा या बेकायदा वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांनीच बळी घेतल्याचे सांगितले जात आहे.

## बौद्ध पौर्णिमेनिमित्त श्रीरामपुरात भगवान गौतम बुद्धांची मिरवणूक





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर येथे २५७० व्या वेसाक (बौद्ध पौर्णिमा) निमित्त भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या बुद्धरूपाची मिरवणूक उत्साहात काढण्यात आली. या कार्यक्रमाचे नियोजन भारतीय बौद्ध महासभेचे माजी तालुकाध्यक्ष सुगंधराव इंगळे तसेच लुंबिनी बुद्ध विहार व्यवस्थापन समितीचे दादासाहेब बनकर व दिलीप सदाशिव यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी साडेआठ वाजता महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मानवंदना देऊन झाली. त्यानंतर सकाळी नऊ वाजता धम्मध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. सकाळी दहा वाजता ट्रॅक्टर-ट्रॉलीवर आकर्षक सजावट करून भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेची मिरवणूक शहरातून काढण्यात आली.

मिरवणुकीत मोठ्या संख्येने बौद्ध बांधव सहभागी झाले होते. साडेअकरा वाजता मिरवणुकीची सांगता करण्यात आली. त्यानंतर लुंबिनी बुद्ध विहार येथे त्रिशरण, पंचशील व अष्टशील ग्रहण करण्यात आले तसेच भोजनदानाचा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा स्मारक समितीचे अध्यक्ष सुभाष त्रिभुवन, आंबेडकर चळवळीतील अशोक बागुल, महेंद्र त्रिभुवन, माजी नगरसेवक प्रकाश ढोकणे, रिपब्लिकन सेनेचे चरण त्रिभुवन, निलेश भालेराव, पीपल्स पार्टीचे संतोष मोकळ, गोरख आढाव, अशोक दिवे, सुरंजन साळवे, आमदार हेमंत उगले, नगराध्यक्ष करण ससाणे, आदींनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात मिलिंद साळवे कैलास लोखंडे श्रीकांत मोरे किशोर ठोकळ सी. एस. बनकर, रावसाहेब मोहन, डी.एल. भोंगळे, पी, डी, सावंत, सुमन त्रिभुवन कांता लोखंडे अनघा त्रिभुवन छायाताई दाभाडे सुशीला सातदिवे रिया त्रिभुवन जिजाबाई पगारे विजय शेळके केसी दाभाडे डॉ पंडित पगारे आकाश त्रिभुवन सुप्रिया त्रिभुवन यांची उपस्थिती होती. तसेच शुभ्रा बनकर सानवी ठोकळ या विद्यार्थिनींनी भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर सुंदर भाषणे केली, ज्याला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरिता सावंत यांनी केले तर आभार एल एन मस्के यांनी मानले.

## आंतरजातीय विवाहाच्या कारणावरून तरुणीला मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** नेवासा तालुक्यातील सोनई येथे आंतरजातीय विवाह केल्याच्या कारणावरून एका तरुणीच्या घरात घुसून तिला मारहाण करत धमकावल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात ७ ते ८ जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना दि. ३० एप्रिल रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास सोनई येथे घडली. फिर्यादी तरुणीच्या घरी आरोपींनी जबरदस्तीने प्रवेश करून आंतरजातीय विवाह केल्याचा राग मनात ठेवून तिच्याशी शिवीगाळ केली. तसेच, तू आमच्या कुटुंबाची इज्जत घालवली आहेस, असे म्हणत धमकावले. यावेळी आरोपींनी तरुणीला जबरदस्तीने सोबत येण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला. तू आमच्यासोबत आली नाहीस तर तुला ठार मारू, तसेच तुझ्या नवऱ्यालाही संपवू, अशा गंभीर धमक्या देत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी भैया गनीभाई शेख, असुर भैया शेख (रा. मिरी, ता. पाथर्डी), जुबेर पठाण, फिरोज पठाण (रा. माणिकदवंडी, ता. पाथर्डी) यांच्यासह इतर अनोळखी ७ ते ८ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३३, १८९(२), १९१(२), ३५२, ३५१(२)(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर जखमी तरुणीवर प्राथमिक आरोग्य केंद्र, सोनई येथे उपचार करण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ. बी. जी. बाचकर हे करीत आहेत.

## राहुरी शहरातून १६ वर्षीय मुलगा बेपत्ता; शोधमोहीम सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी :** शहरातील पोपळघट इस्टेट परिसरातून १६ वर्षीय मुलगा अचानक बेपत्ता झाल्याची घटना घडली असून परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. ओम मुकुंद मिसाळ असे हरवलेल्या मुलाचे नाव असून तो दि.३० एप्रिल रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास बेपत्ता झाला. मिळालेल्या माहितीनुसार, ओम हा घराजवळील पाण्याच्या टाकी परिसरात खेळत होता. काही वेळानंतर तो दिसेनासा झाल्याने कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला. मात्र काहीच माहिती न मिळाल्याने त्यांनी तातडीने राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेतली. दरम्यान, सीसीटीव्ही फुटेजमध्ये ओम हा पाण्याच्या टाकी परिसरातून छत्रपती नगर रोडच्या दिशेने जाताना दिसून आला आहे. त्यानंतर तो कुठे गेला, याचा तपास पोलीस करत आहेत. ओमची उंची सुमारे ५ फूट, वर्ण सावळा असून अंगावर पांढऱ्या रंगाचा फुल शर्ट व चॉकलेटी रंगाची फुल पॅन्ट होती. तो राहुरी फॅक्टरी येथील डिपॉल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये इयत्ता दहावीचा विद्यार्थी आहे. या प्रकरणी राहुरी पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली असून नागरिकांनी माहिती मिळाल्यास ८४२१६४६४३६, ९८५०१११३०० किंवा सहायक पोलीस निरीक्षक तुळशीराम गीते ९०१११ २५५५४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## घोडेगाव परिसरातून १७ वर्षीय मुलगी बेपत्ता; गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** नेवासा तालुक्यातील घोडेगाव परिसरातील साईनगर येथून १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी अचानक बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, समीक्षा रमेश शहाराव (वय १७ वर्षे ६ महिने, रा. साईनगर, घोडेगाव) ही मुलगी दि.२ मे रोजी दुपारी सुमारे १.५७ वाजण्याच्या सुमारास घराजवळून अचानक गायब झाली.

कुटुंबीयांनी परिसरात शोध घेतला, मात्र ती कुठेही आढळून आली नाही. मुलीचा रंग सावळा, बांधा सडपातळ, उंची अंदाजे ४ फूट ५ इंच असून केस काळे आहेत. बेपत्ता होताना तिने निळ्या रंगाचा टॉप, निळी जीन्स पँट व गुलाबी रंगाच्या स्लीपर परिधान केल्या होत्या. तिच्या उजव्या हातावर मोरपीसाचा टॅटू आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १३७(२) अन्वये गुन्हा क्रमांक १५९/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

अपहरणाची शक्यता गृहित धरून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ. बी. एम. गावडे तपास करत आहेत. मुलीबाबत माहिती मिळाल्यास तातडीने सोनई पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## माथाडी हमालाचा मुलगा झाला पोलीस उपनिरीक्षक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** नेवासा तालुक्यातील भानसहिवरा येथील सर्वसामान्य कुटुंबातील व नेवासा मार्केट यार्ड मध्ये माथाडी कामगार व तोलाई काम करणारे वडील स्व.भाऊसाहेब टाके यांच्या व आई लक्ष्मीबाई यांच्या आशिर्वादामुळे मुलाने दादासाहेब भाऊसाहेब टाके यांनी एमपीएससी परीक्षेत यश संपादन करून त्यांची पोलीस उपनिरीक्षक पदी नियुक्ती झाली आहे. त्यांनी खडतर प्रवासात हे यश संपादन केलेले आहे.त्यांच्या कुटुंबात बहीण आश्वीनी, भाऊ रामेश्वर आहे, त्यांच्या चेहऱ्यावर वडिलांचे दुःखाचे व आनंदाश्रू दाटले होते.यावेळी माजी सरपंच देविदास साळुंके यांनी तरुणाने जिद्द,स्वप्न कक्षा, आणि बौद्धिक मेहनत या तत्त्वामुळे यशाची कुठलेही स्वप्ने आज तरुण साकारू शकतो, असे तरुणांना ठणकावून सांगितले.

यावेळी माजी सरपंच अशोक बोरा, माथाडी कामगार संघटनेचे नेते बाबा आरगडे, मार्केट कमेटीचे संचालक हरिभाऊ शिंदे यांचे मार्गदर्शन तसेच अशोक कदम, सोमनाथ शेंडे,व्यापारी प्रीतम साळुंके, कैलास टाके, महबूब शेख, अमोल गुजर, सुभाष शिंदे, जयराज




काळे, अंगणवाडी सेविका रेणुका भणगे,देवगावचे गोपाळकृष्ण पाडळे, सचिव संघटनेचे संभाजी नवले यांच्यासह भानसहिवरा येथील पदाधिकारी ग्रामस्थ उपस्थित होते. टाके यांचा सन्मान ग्रामस्थांच्या वतीने देविदास साळुंके यांनी पुष्पगुछ देउन सन्मान केला. या यशाबद्दल ग्रामीण भागातून कौतुक करण्यात येत आहे.

## युवा सेनेची 'राजा शिवाजी' चित्रपटाद्वारे युवकांना प्रेरणा : योगेश गलांडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरात युवा सेनेच्या वतीने युवा कार्यकर्त्यांना नुकतेच प्रदर्शित झालेले 'राजा शिवाजी' हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम व जीवनावर आधारित चित्रपट दाखविण्यात आला. कोहिनूर मॉलमधील सिनेमागृहात 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी संपूर्ण वातावरण दणाणून गेले होते.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून युवा सेनेने हा प्रेरणादायी उपक्रम हाती घेतला. शिवसेनेचे मुख्यनेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या




प्रेरणेतून, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम महाराष्ट्रभर राबविण्यात आला. राज्यातील लाखो युवा शिवसैनिक व कार्यकर्त्यांनी हा चित्रपट पाहिला. अहिल्यानगर शहरात युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांच्या पुढाकाराने कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला.

या वेळी शहर प्रमुख संभाजी कदम, माजी नगरसेवक सचिन जाधव, विक्रम राठोड, जिल्हा प्रमुख अभिषेक भोसले, ओंकार शिंदे, अमोल हुंबे, सागर गलांडे, अमोल ठोकळ, राहुल जगधने, आजीनाथ शिरसाठ, शशिकांत संसारे, अवी कर्डिले, तुषार शेवाळे, संदीप मगर, विष्णु घुगे, पवन क्षीरसागर, महेश त्रिंबके, महेश थोरवे, रामदास नागरगोजे, अनिल गायकवाड, बागुल, निलेश शेवाळे, घनश्याम घोलप यांच्यासह युवा सेनेचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी संभाजी कदम यांनी सांगितले की, महाराष्ट्र दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांना उजाळा देणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या पराक्रमामुळेच महाराष्ट्र राज्याची पायाभरणी झाली असून, त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. सचिन जाधव म्हणाले , आजचा आधुनिक व प्रगल्भ महाराष्ट्र घडविताना छत्रपतींच्या विचारांचा आधार घ्यावा लागेल.

शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातींच्या मावळ्यांना एकत्र करून स्वराज्य निर्माण केले, ही एकात्मतेची प्रेरणा आजही तितकीच महत्त्वाची आहे. युवा सेनेचे योगेश गलांडे म्हणाले की, युवकांना छत्रपतींच्या विचारांनी प्रेरित करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रभर एक लाखांहून अधिक युवक-युवतींना हा चित्रपट दाखविण्यात आला असून, त्यातून राष्ट्रभक्ती व स्वाभिमानाची भावना दृढ करण्याचा प्रयत्न आहे.

महाराष्ट्र दिन साजरा करताना केवळ उत्सव नाही तर आपल्या इतिहासाची, आपल्या अस्मितेची आणि आपल्या स्वाभिमानाची आठवण करून देणारा दिवस आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्य उभे केले. त्यांनी केवळ राज्य निर्माण केले नाही, तर न्याय, समता आणि धर्मनिरपेक्षतेचे मूल्य रुजवले.